श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक

वर्ष १७ ] शके १८६२ माघ, फाल्गुन [ अंक ११, १२

बाबा बाबा, विठोबितं मना कोंडे ? बोल बाबा ॥
बाबा नामीं, किंतिवरी अंत दिंडूं आड अबाबा ॥



बा बाबिजं, त्यज ग्रहण जा त्या न मुग्धा सबाबा ॥
बा बाबा ना, तुज यमगृहीं जावयाची जबाबा ॥

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

शंकराचार्य

संपादक—रामचंद्र वासुदेव धैसास

# अनुक्रमणिका


संपादकीय ... ... ... ... ... ...

अर्वाचिन भक्तलीलामृत ... ... ... ... ...

शिर्डीवृत्त ... ... ... ... ... ...

अनुभव ... ... ... ... ... ...


## श्रीसाईभक्तांस विनंती

साईलीलेचें वर्ष चैत्र महिन्यापासून सुरु होतें. तरी अंक सुरु करणें आ चैत्रापासून वर्गणीदार झालें पाहिजे.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना येथून पाठविले उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोंहचतां परत येतात. तरी कृपा करून आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. म्हात्रेकर, २७ रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनीं आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खाल पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनी चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ३ आणे अ पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठवून अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत ये


**रा. बा. धैसास, सम्पादक.**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २

गोखले रोड नॉर्थ; दादर, मुम्बई १४.

## सूचना

श्री दासगणू महाराजांच्या " अर्वाचिन भक्त व संतलीलामृत या
ोन भक्तिभावनेनें परिप्लुत पोथ्यांत श्रीसांईबाबांच्या संबंधानें एकंदर चार
ासादिक अध्याय प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत श्री संतलीलामृत ही पोथी
त्यंत दुर्मिळ झाली आहे, तेव्हां या दोन्हीं पोथ्यांतले हे चार अध्याय
ुन्हां प्रसिद्ध व्हावेत. जेणेंकरून श्री सांईमाउलीच्या भक्तांना नित्यनैमि-
िक पठण करण्यास सोईस्कर व्हावें, अशी अनेक भक्तांकडून सूचना
ाल्यावरून ते अध्याय श्रीसांईलीला मासिकांत पुन्हां प्रसिद्ध करण्यांत
त आहेत.

संपादक श्रीसांईलीला.

---

# अर्वाचिन भक्त लीलामृत

## अध्याय ३१ वा.

श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी पंचतुंडा उमापती। जय-
याजी प्रतापज्योती। तुझें बालक मी निश्चितीं। माझी उपेक्षा करूं
को ॥ १ ॥ कैलास पर्वत परम रम्य। तें त्वां केलें निवासधाम।
दोषकालीं पुरुषोत्तम। तुजलागीं ध्यातसे ॥ २ ॥ पूर्वी दक्षप्रजा-
ती। तुज अवमानितां पशुपती। कोपोनी तूं निश्चितीं। वीरभद्र
ाठविला ॥ ३ ॥ स्वभक्तांचें करण्या रक्षण। दक्ष असती तूं
र्वतीरमण। तो तूं मज दयाघन। कां उपेक्षिसी कळेना ॥ ४ ॥

काय तुझ्या आलें मनीं। कीं हा पातकी अज्ञानी। ह्मणोनी शूलपाणी। भेटसीना अजूनी मज ॥ ५ ॥ परी व्याधाचें मनी वृत्त आणणें हे उमानाथ। मी लेंकरूं तुझें सत्य। माझी उपेक्षा क नको ॥ ६ ॥ असो ईश्वराचे भक्त निर्माण। कोणत्याही जाती पावोत जनन। ते साक्षात् होती नारायण। तेथें शंका घेणें न ॥ ७ ॥ जयांची मुळींच एक जाती। जैसी हृदयांत प्राणज्योती किंवा जगांत एक विभूती। ईश्वर जैसा सात्र कीं ॥८॥ मतें पंथ भिमान। यांतें न ज्यांच्या चित्तीं स्थान। तेथें द्वैत कोठून। क रिघाव सूज्ञ हो ॥ ९॥ पूर्वी कमाल कबीर। होऊन गेले भक्त थो त्यांचे जातीस परमेश्वर। काय पाहता जाहला ॥ १० ॥ ई भावाचा भुकेला। हाची आहे दुष्काळ त्याला। सद्भक्तीस अ विकला। दयाधन पांडुरंग ॥११॥ कोणत्याही जातींत। वा को त्याही स्थितींत। निर्माण होवोत भगवद्भक्त। ते प्रिय हरीतें ॥१ गंगेचिया दक्षिणेस। ग्राम एक चार कोस। शिरडी नाम विल त्यास। कोपरगांवा संनिध ॥ १३ ॥ तया शिरडी ग्रामासी। आ महाराज पुण्यराशी। बाबासाई जयासी। म्हणती अवघे भक्तज ॥ १४ ॥ तयांचा तो ठावठिकाण। न कळे कवणा लागून। चि आनंदमय पूर्ण। जयाचें तें सर्वदां ॥ १५ ॥ कोणी जरी केला प्रश्न कीं आपण आलांत कोठून। ठावठिकाण नामाभिधान। काय सां आपुलें ॥१६॥ ऐसा प्रश्न होतांक्षणीं। महाराज देती उत्तर ह्मणी जेवीं मेघगर्जना होतां गगनीं। धारा अवतरती भूवरी ॥ १७ ॥ आह्मास नाहीं ठावठिकाण। आह्मी मुळींच निर्गुण। कर्मवशे पावू बंधन। पिंडाप्रती पावलों ॥ १८ ॥ या पिंडासी देह म्हणती। दे आमुचें नांव निश्चितीं। विश्व हेंची गांव निगुती। आमुचें जाण

र्वथा ॥ १९ ॥ ब्रह्म आमुचा जनिता ॥ माया आमुची माता ।
योगें ती साकारता । आम्ही पावलों शरीर हें ॥ २० ॥ हेंची
याचें प्रत्युत्तर । लोकांचिये प्रश्नावर । जग अवघें नश्वर । भावना
याची सर्वदां ॥ २१ ॥ त्या महाराजें शिरडींत । चमत्कार केले
गणित । सकल वर्णावया येथ । नाहीं मती दासातें ॥ २२ ॥
र्धीच तें गांव लहान । त्यांतून थोडकीं दुकान । तींही असतीं
हुत सान । हिंगबोजवार विक्रीचीं ॥ २३ ॥ त्या दुकानदारांपासीं ।
हाराज मागून तेलासी । दीप लाविती मशिदीसी । तैसेच देउळीं
गणित ॥ २४ ॥ ऐशापरी कित्येक वेळां । साईनें दीपोत्सव केला ।
त्य तेल देण्याला । वाणी अवघे कंटाळले ॥ २५ ॥ दुकानदार
वघे जन । करिती विचार एकवटून । रोज आणावें कोठून । तेल
ातें याव्रया ॥ २६ ॥ ऐसा विचार करूनी मानसीं । महाराज येतां
ुकानासी । खोटेंच सांगती तयांसी । तेल नाहीं म्हणूनियां ॥ २७ ॥
ऐसें उत्तर ऐकतांक्षणीं । बाबा चकित झाले मनीं । असत्य वदण्या
ालागूनी । कांहीं न वाटे अवघड ॥ २८ ॥ यानेंच हे बुडाले
न । दुरावला नारायण । पुढें हे पावती पतन । आपुलिया कर्म-
शें ॥ २९ ॥ जो असत्य वदे वाणी तो पातक्यांचा मुगुटमणी ।
यासी तो चक्रपाणी । न भेटे कदापी ॥ ३० ॥ सत्य वाक्य ज्याचें
वळ । तयाचा विकला घननीळ । जपतपादि सकळ । सत्यापुढें
ापुडे ॥ ३१ ॥ सत्य पुण्याईचा घाट । सत्य ही मोक्षाची वाट ।
सत्य आनंदनदीचा घाट । तें सत्य न सोडावें ॥ ३२ ॥ वाण्यांसी
न देतां प्रत्युत्तर । महाराज निघाले सत्वर । कृत्य केलें अघटित
ार । अगाध लीला बाबांची ॥ ३३ ॥ मशिदीच्या सभोंवार ।
णत्या ठेविल्या प्रचुर । कांकडे घातले आंत थोर । कौतुकें लोक

पाहती ॥ ३४ ॥ जन परस्परें बोलती । तेलावीण कैसे लागती। दीप येथें निश्चितीं । वेडापीर असे हा ॥ ३५ ॥ खडकीं पेरणें बीजालागुन । अथवा वांझेचें बाळंतपण । करावया सूज्ञ जन। ईच्छील काय कधीं तरी ॥ ३६ ॥ हा वेड्यांचा शिखा- मणी । अज्ञान्यांचा अग्रणी । दीप तेलावांचूनी । लावावया इच्छितसे ॥ ३७ ॥ तेल होतें टमरेलांत । लावण्यापुरतें सांजवात। तें घेऊन हातांत । गेले बाबा मशिदीसी ॥ ३८ ॥ तैं नानासाहेब डेंगळें। लोकांसी बोलूं लागले। तुम्हीं अंध झालां सगळे। उगी तयासी निंदूं नका ॥ ३९ ॥ कोणाची योग्यता कैशापरी। हें एक जाणें श्रीहरी। हिरा पडला जरी गारीं। तरी कां गार मानावा ॥४०॥ कांहीं वेळ बसा स्वस्थ। हा फकीर काय करितो येथें। तें पहा हो सावचित्त। वृथा घाई करूं नका ॥ ४१ ॥ ऐसें लोकांस सांगितलें। डेंगळे मशिदीसी आले। मौनव्रत धारण केलें। चमत्कार पहावया ॥ ४२ ॥ तैं काय केलें महाराजांनीं । तेलांत घालून अर्धें पाणी। आत्मारामालागुनी । अर्पण केलें तेधवां ॥ ४३ ॥ तेलमिश्रित पाणी प्याले । मग निवळ पाणी घेतलें। पण त्यां मार्जी ओतलें। स्नेहाऐवजीं तत्क्षणीं ॥ ४४ ॥ काडी ओढून पेटविले। दीप बाबांनीं अवघे भले। चकित झाले डेंगळे। पाय धरले जावोनि ॥ ४५ ॥ दिवे जाळिले रात्रभर। लोक पाहती चमत्कार। केवढा बाबांचा अधि- कार। प्रती ईश्वर जन्मला ॥ ४६ ॥ शिरडीचे लोक मिळाले। साईपदीं लीन झाले। म्हणती आम्ही अपराध केले। कोपूं नका आम्हांवरी ॥ ४७ ॥ आम्हीं पोरें तुमची। तुम्हीं आहां माय साची। क्षमा करा अपराधांची। साई महाराज कृपानिधी ॥ ४८ ॥ तुम्हीं कृपेचा सागर। तुम्हीं ज्ञाननभींचे दिनकर। तुम्हीं सद्गुणांचें सरोवर।

शांततेचे मेरु तुम्हीं ॥ ४९ ॥ तेधवां बाबा अवघ्यांप्रती। बोलूं लागले निश्चितीं। तुम्हीं ऐकारे माझी उक्ती। ये समयीं सावचित्तें ॥ ५० ॥ वर्तन ठेवा ऐशापरी। जेणें राजी राहील श्रीहरी। असत्य न वदावी वैखरी। सत्य सदा सांभाळावें ॥ ५१ ॥ घातपात कवणाचा। करूं नका कधींच साचा। धर्मकर्मीं द्रव्याचा। व्यय करावा यथाशक्ती ॥ ५२ ॥ तरीच होईल कल्याण। अन्तीं भेटेल नारायण। हें माझें सत्य वचन। सदा वागवा मानसीं ॥ ५३ ॥ तें मानलें अवघ्यांसी। वंदून साईचरणांसी। लोक गेले स्थानासी। अती आनंदें आपल्या ॥ ५४ ॥ साई महाराज योगाभ्यासी। किती वर्णावें तयांसी। त्यांच्या अगम्य लीलेसी। वर्णितां नये पार कधीं ॥ ५५ ॥ हें अखिल वर्तमान। चितांबरालागुन। डेंगळ्यांनीं केलें कथन। तेही भाविक म्हणोनियां ॥ ५६ ॥ असो शय्या विचित्र बाबांची। एक फळी लांकडाची। रुंदी एक वीत साची। असे लांब चार हात ॥ ५७ ॥ तीच त्यांचा स्यंदन। तीच त्यांचें हंतरुण। जीर्ण चिंध्यांनीं बांधून। टांगिलीसे मशीदींत ॥ ५८ ॥ ती मशीद होती जीर्ण। किलचाही गेल्या निघून। अगदीं अद्याचे सन्निधान। फळी टांगिली बाबांनीं ॥ ५९ ॥ नुसते बैसतां तिच्यावरी तनू होय धनूपरी। ऐशा विचित्र शय्येवरी। शयन करिती महाराज ॥ ६० ॥ फळीचे उभय बाजूंसी। म्हणजे उशापायथ्यासी। लावून दिवे पुण्यराशी। निजती योगबळानें ॥ ६१ ॥ नुसता पाय ठेवितां वरी। जी तुटेल निर्धारीं। ऐशी तिची बळकटी खरी। काय वर्णन करावें ॥ ६२ ॥ तें असत्य वाटे कित्येकांस। म्हणून मुद्दाम रात्रीस। जाऊन पाहती बाबांस। तों ते निद्रिस्थ फळीवरीं ॥ ६३ ॥ ही मौज पाहण्याप्रती। दाटी होऊं लागली अती। तेणें उपाधी निश्चितीं।

होऊं लागली सर्वदां ॥ ६४ ॥ त्या फळीस म्हणूनी । तोडून टाकिलें एके दिनीं । मोकळें आसांपासूनी । शीघ्र व्हावया कारणें ॥ ६५ ॥ ख्याती झाली लोकांत । बाबासाई महा महंत । नवसही अनंत । करूं लागले तयांप्रती ॥ ६६ ॥ शिरडी झालें महाक्षेत्र । वाराणसी-सम पवित्र । बाबामुळें सर्वत्र । नांव झालें तियेचें ॥ ६७ ॥ जैसें पुष्पयोगें मृत्तिकेस । किंवा हिऱ्यामुळें कोंदणास । वा सुवर्णामुळें चिंधीस । महत्व येतें तैशापरी ॥ ६८ ॥ तैसें शिरडीस बाबामुळें । भूमंडळीं महत्व आलें । खेड्याचें क्षेत्र बनलें । थोर योग्यता साधूची ॥ ६९ ॥ असो एके समयासी । मंडळी आली बहुवसी । त्या शिरडी ग्रामासी । सिद्धदर्शन घ्यावया ॥ ७० ॥ चांदोरकर कुळभूषण । गोविंदात्मज नारायण । कलेक्टराचा चिटणीस जाण । नानासाहेब म्हणती जया ॥ ७१ ॥ दुजे रामदास हरिदास । वास जयांचा वाईस । तिसरे त्यांचे सोबतीस । होते बापू नगरकर ॥ ७२ ॥ कानगांवकर ते चौथे । ऐसे जमोन आले तेथें । सिद्धदर्शन घ्यावयातें । शिरडीग्रामीं श्रवण करा ॥ ७३ ॥ त्या रामदासी बुवासी । जाणें होतें दुसरे दिवशीं । हनुमंताच्या जयंतीसी । सीनातटीं नगरांत ॥ ७४ ॥ ते तळमळ करूं लागले । म्हणती पाहिजे आतांच गेलें । दर्शन घेणें पुरे झालें । चला गाडी आटोपा ॥ ७५ ॥ तैं महाराज म्हणती चिटणीसासी । प्रथम करूनी भोजनासी । मग जावें वाटे मशीं । तुम्हीं नगराकारणें ॥ ७६ ॥ या ऐकोन महाराज वचना । स्तब्ध झाले साहेबनाना । घेऊन कानगांवकरांना । केली तयारी भोजनाची ॥ ७७ ॥ इकडे तो वाईकर । जावया झाला बहुत आतुर । म्हणे अहो बापूनगरकर । काय विचार करणें आतां ॥७८॥ माझी उद्यां आहे कथा । नगरामाजीं तत्त्वतां । या वेड्याच्या नादा

आतां । लागणें पुरे झालें ॥ ७९ ॥ चिटणीसाचें आहे ठीक । घरीं पैसा मुबलक । मला मागणें येईल भीक । लागतां नादीं साईच्या ॥ ८० ॥ येथें न प्राप्ति कवडीची । चला वाट धरूं स्टेशनाची । गाडी पाहिजे आतांची । साधिली आपणां अवश्य ॥ ८१ ॥ ऐसें बोलून निघाले । उभयतां स्टेशनावरी आले । मागें शिरडीस राहिले । कानगांवकर व चिटणीस ॥ ८२ ॥ महाराज म्हणती चिटणीसासी । पहा जनांची रीत कैसी । सोडोनी साथिदारांसी । दक्ष असती मतलबा ॥ ८३ ॥ म्हणोनी ऐसा करावा साथी । जो न सोडी कल्पांतीं । जैसा सुवास सुमनाप्रती । कधींही न विसंबे ॥ ८४ ॥ असो झालीं भोजनें । आतां तुम्हींही येथून जाणें । जें बोललों तें मनीं धरणें । अवकाश आहे गाडीस ॥ ८५ ॥ तें मानिलें चिटणीसांनीं । ठेवून मस्तक साईचरणीं । निघते झाले तेथोनी । स्टेशनावरी यावया ॥ ८६ ॥ इकडे बापू आणि कथेकरी । बसले उपाशीं स्टेशनावरी । चटफडत आपुले अंतरीं । कांहीं न मिळे खावया॥८७॥ चिटणीसांना पाहून । गेले दोघे विरघळून । खालीं घालोनीयां मान । माती उकरीत बैसले ॥८८॥ चांदोरकर पुसती तयासी । कां हो न गेलां नगरासी । गाडी न मिळाली वाटतें मशी । तुम्हां जावया कारणें ॥ ८९ ॥ तें म्हणे तो नगरकर, आज गाडीस आहे उशीर तीन घंटे साचार । भेलों उपाशीं मात्र आम्हीं ॥ ९० ॥ साधूचें नायकिलें । त्याचें हें फळ लाधलें । तुम्हीं मात्र बरें केलें । फजीत आम्हीं पावलों ॥ ९१ ॥ मग अवघे बसून गाडींत । आले शहर नगराप्रत । त्रिकालज्ञ बाबा सत्य । नमन माझें तयासी ॥ ९२ ॥ असो शिरडी ग्रामींचा । अप्पा कुळकर्णी होय साचा । शुद्ध भाव जडला त्याचा । साईचिये पदापाशीं ॥ ९३ ॥ पूर्वकर्म जैसें असे ।

तैसी बुद्धि होतसे । त्या आप्पाच्या कर्मवशें । काय घडलें तें ऐका ॥९४॥ कांहीं एके कामांत । अप्पावरी आली आफत । ती खरी अथवा खोटी सत्य । हें ठाऊक ईश्वराला ॥ ९५ ॥ गवगवा झाला लोकांत । अप्पा कुळकर्णी लबाड सत्य । तैसेंचि भूपाचे मनांत । आलें असे त्याविषयीं ॥ ९६ ॥ कोणी म्हणती तयावरती । खटला होणार निश्चितीं । ऐसें ऐकतां चित्तीं । धडकी अप्पाच्या भरली असे ॥ ९७ ॥ अप्पासी केलें बोलावणें । प्रांताच्या साहेबानें । हुकूम लिहून धाडिला त्यानें । यावें तुम्हीं जबाबा ॥ ९८ ॥ हुकूम पडतां पाहांत । आप्पा झाला भयभीत । म्हणे आतां शिरडीप्रत । येणें कशाचें घडतें हो ॥ ९९ ॥ निघते वेळीं तयांनीं । बाबांस जोडिले दोन्ही पाणी । बोलता झाला गहिवरूनी । कठिण प्रसंग आला हा ॥१००॥ तुम्हीं साधु सत्पुरुष । तुम्हीं साक्षात् श्रीनिवास । तुम्हीं शास्ते काळास । हें मी जाणतों गुरुराया ॥१०१॥ ही माझे वरची आफत । सत्य आहे किंवा मिथ्य । हें जाणसी तूं समर्थ । त्रिकालज्ञ महाराजा ॥ १०२ ॥ त्याविषयीं बोलणें नाहीं । अब्रू राख माझे आई । रडूं लागला धायी धायी । पायां मिठी घालोनी ॥ १०३ ॥ माझें कांहीं वाईट होतां । आपलें नांव जाईल समर्था । याचा विचार आणोन चित्ता । संकट माझें हरावें ॥१०४॥ जवळीं असतां कुबेर । कां हिंडावें दारोदर । सोसोनी क्षीरसागर । मीन जाय ओहोळाकडे ॥ १०५ ॥ माझा वशिला तुझे पाय । तूंचि माझी बापमाय । या वेळीं साह्य होय । संकट माझें हरावें ॥ १०६॥ मजला म्हणती अवघे जन । हा बाबांचा कल्याण । शिक्षा होतां मजलागून । काळोखी लागेल तुम्हांतें ॥ १०७ ॥ कामधेनूचे पोरांनीं । कां लागावें अन्यस्तनीं । कल्पवृक्षाचे फळांनीं । कां

पडावें कांव्यांत ॥ १०८ ॥ ह्याचा करा विचार। कृपा करा माझे-
वर। जगांत अवघ्या नाहीं तर। निंदा होईल आपुली ॥ १०९ ॥
ऐसें ऐकतां दीन वचन। महाराज द्रवले मनीं पूर्ण। बोलले अप्पा-
लागून। ऐक वचन माझें हें ॥ ११० ॥ नेवाशास प्रांतस्वारी।
आहे सांप्रत प्रवरातीरीं। तुवां जावें तेथवरी। भय चित्तीं मानूं नको
॥ १११ ॥ तेथें जगाचा सूत्रधार। मोहिनी रूप परमेश्वर। ज्या
नमिता झाला ज्ञानेश्वर। भावार्थदीपिका लिहितांना ॥ ११२ ॥ जो
दशावतार धरिता। जो अल्लाइलाही तत्वतां। मूढ जीवांचे उद्धा-
रार्था। सगुण झाला परमेश्वर ॥ ११३ ॥ तया करूनी नमस्कार।
साहेबापुढें व्हावें हजर। पाठ तुझी साचार। तोचि राखील निश्चयें
॥ ११४ ॥ तें अप्पानें मानिलें। प्रवरातटास येणें केलें। मोहिनी
राजास वंदिलें। मग गेले कचेरीस ॥ ११५ ॥ हृदयीं बाबांचें
स्मरण। जबाब दिला लिहून। तो साहेबानें ऐकोन। सोडून दिलें
तयातें ॥ ११६ ॥ साहेब म्हणे अप्पासी। त्वां न खाल्लें पैशासी। ऐसें
खातरीनें वाटे मशीं। जा म्यां तुला सोडिलें ॥ ११७ ॥ तें ऐकतां
हुजूरवचन। आनंदलें आप्पाचें मन। शिरडीकडे तोंड करून।
नाचूं लागला आनंदें ॥ ११८ ॥ हे सायी महाराज कल्पद्रुमा। भक्त-
जनांचे पूर्णकामा। वैराग्याच्या निवासधामा। केलीस कृपा माझे-
वरी ॥ ११९ ॥ तेणें मी झालों धन्य। या जगामाजीं जाण।
अब्रूचें केलें रक्षण। माझ्या तुवां पुण्यवंता ॥ १२० ॥ आप्पा तेथून
दुसरें दिशीं। परत आला शिरडीसी। नमून सायीपदासी। वर्तमान
श्रुत केलें ॥ १२१ ॥ बोलले बाबा त्यावर। करता करविता पर-
मेश्वर। भक्तासाठीं शारङ्गधर। जें न घडे तें घडवीतसे ॥ १२२ ॥
पुढें एके समयास। नारायण कृष्ण पेणशास। दाखविलें चमत्का-
रास। तें कथानक ऐका हो ॥ १२३ ॥ कांता तया पेणशाची।

172

परम भाविक उदार मनाची । तिची इच्छा दर्शनाची । झाली असे बाबांच्या ॥१२४॥ सती विनवी जोडून करा । हे मत्सौभाग्य भांडारा । हे मत्सौख्यनभींचे दिनकरा । माझी विनंति ऐका हे ॥ १२५ ॥ कर्णोपकर्णी ऐकिली मात। शिरडी नामक ग्रामांत। बाबा साधी महा महंत। दर्शनायोग्य असती ॥ १२६ ॥ म्हणून वाटतें माझ्या मनीं। चला त्या गावां लागुनी। लीन होऊं संत-चरणीं। आपण उभयतां प्राणेश्वरा ॥ १२७ ॥ पेणसे म्हणती त्यावरी । ऐक मद्वचना सुंदरी । शिरडी ग्रामा भीतरीं । कोणी न संत सुशीले ॥१२८॥ तेथें एक मुसलमान । वेडापिसा आहे जाण। बळेंच ढोंग माजवून। जग लुटाया बैसला ॥ १२९ ॥ त्याचा मांडिला देव्हारा । या अज्ञ जनांनीं खरा। म्हणोन ऐके माझी गिरा। भलता हट्ट घेऊं नको ॥१३०॥ जेथें मुर्खांच्र आरपण । तेथें मधुरत कोठून। बेगडाचें उत्तम सुवर्ण । होईल कां सांग कांते ॥ १३१। तूं न पडावें याचे भरी। तो शिरडी मधला भिकारी। तुकडे मागोन घरोघरीं। पोट आपलें भरीतसे ॥१३२॥ साध्वीचे चित्तीं तळमळ। परी लागलीसे प्रबळ। म्हणे कधीं अर्पीन भाळ। त्या महाराज पदीं मी ॥ १३३ ॥ पेणशे पुढें फिरत फिरत। आले शिरडी ग्रामांत। सर्व कांता सद्गुणी शांत। नाम माई जियेचें ॥ १३४ ॥ पेणसे सर-कारी कामीं गुंतले। तों साध्वीनें काय केलें। जावोनी आपुलें साधिलें। कार्य तेधवां दर्शनाचें॥ १३५॥ साधी पदीं अर्पितां भाळ। निमाली मनाची तळमळ। समाधान झालें सकळ। कौतुकें सांगे पतीसी ॥ १३६ मी गेलें दर्शनासी। तो खराच आहे पुण्य-राशी। तुम्हीं नका निंदू त्यासी। दर्शन घ्या हो साधूचें ॥ १३७॥ कांतेच्या आग्रहावरून। आले दर्शना कारण। तें महाराज बोलले

गर्जोन । येऊं नका कोणी येथें ॥ १३८ ॥ धोंडा घेऊन हातीं । पुढें येतां मारीन म्हणती । मी आहें ढोंगी अती । माझें दर्शन घेऊं नका ॥ १३९ ॥ मी जातीनें आहें हीन । वेडा पिसा मुसलमान । तुम्हीं उच्चवर्णी ब्राह्मण । बाटाल दर्शन घेतांची ॥ १४० ॥ ऐसें बोलतां तयासि । पेशवे विरघळले मानसीं । म्हणती हा असे ज्ञानराशी । त्रिकालज्ञ महाराज ॥ १४१ ॥ आम्हीं बोललों उभयतां । तें या कळलें तत्वतां । जैसी वाऱ्याची व्यापकता । तैसी यांच्या ज्ञानाची ॥ १४२ ॥ पेशव्यांनीं विचार केला । लावून आपाचा वशीला । लाभ करूनीं घेतला । सत्पुरुष दर्शनाचा ॥ १४३ ॥ यास लोटतां कांहीं दिन । काय घडलें वर्तमान । तें ऐका हो भाविकजन । श्रवणीं सादर बैसावें ॥ १४४॥ एके दिनीं सहजगती । महाराज बोलले अप्पा-प्रती । आज चोरटे निश्चितीं । आले आपल्या गांवांत ॥ १४५ ॥ या चोरांची तऱ्हा निराळी । घराचा विक्षोभ न करिती मुळीं । ऐन-मालावरी सगळी । दृष्टी असे तयांची ॥ १४६ ॥ तो करूनी हरण । जाती सर्व घेऊन । चोरी करीतां न दिसती जाण । ऐसे महा बिलं-दर ॥ १४७ ॥ त्यांची प्रथमतः होईल स्वारी । आज वेड्या तुझ्या-वरी । यास्तव जा कांहींतरी । बंदोबस्त करावया ॥ १४८ ॥ मथि-तार्थ या गोष्टीचा । अप्पासी न कळला साचा । पहारा बसवून भिल्लांचा । लौकिकी बंदोबस्त केला असे ॥ १४९ ॥ गल्लोगल्लीं फिरे गस्त । होतां एक प्रहर रात्र । जुलाब उलट्या अप्पाप्रत । होऊं लागल्या मरीच्या ॥ १५० ॥ शरीर झालें अवघें गार । वांबें व्यापिलें पदकर । नासीक कळस साचार । झालासे वांकडा ॥ १५१ ॥ खोल-खोल डोळे गेले । नाड्यांनीं स्थान सोडिलें । लोक शोकाकुल झाले । पाहून स्थिति अप्पाची ॥ १५२ ॥ कांता झाली घाबरी । पाहतां

नवऱ्याची स्थिति खरी। धांवोन आली झडकरी। मशीदींत बाबांच्या ॥१५३ महाराजांचे धरून पाय। रडूं लागली धाय धाय। बाबा माझा पतीराय। सोडूनियां चालला॥१५४॥ द्या हो उदी अंगारा। तेणें उतार पडेल जरा। सौभाग्य जहाज सागरा। नका बुडवूं महाराजा ॥१५५॥ महाराज म्हणती तियेशीं। नको करूं शोकासी। जो जन्मला मृत्यू त्यासी। आहे येणार एके दिनीं ॥१५६॥ मृत्यु जन्म इश्वरी कळा। तोच उरला भरून सगळा। करूं गेलिया तो वेगळा। कांहीं नये हाताशीं ॥१५७॥ कोणी न जन्मे मरे कोणी। पहा परी ज्ञान चक्षूंनीं। तूंही न निराळी त्या पासोनी। येईल हें प्रत्यया ॥१५८॥ जैशी बंडी झालिया जीर्ण। लोक देताती फेकून। किंवा नावडे म्हणून। त्याग करिती तियेचा॥ १५९॥ तैसें हें शरीर वसन। पांघरलासे बाळे प्राण। तो प्राण नारायण। अक्षय अभंग निर्विकल्प। १६०॥ म्हणून अंगारे करूं नको। उगीच ठिगळे मारूं नको। आड त्याच्या येऊं नको। जाऊं दे त्यास मुक्कामा॥ १६१॥ माझ्या आधींच अप्पानीं। बदलावया आपुली कफनी। केली तयारी त्या लागुनी। तूं आड येऊं नको ॥१६२॥ अप्पास मिळेल सद्गती। मोक्ष आला त्याचे हातीं। चर्मचक्षूंच्या आड निश्चितीं। होताहे तो होऊं दे ॥१६३॥ ऐसें निरवुन तियेसी। लावून दिधले गेहासी। झाला अप्पा स्वर्गवासी। तात्काळ कांहीं वेळानें ॥ १६४॥ दुसरे दिवशीं गांवांत। दोन तीन लागले लोक सत्य। अवघे झाले भयाभीत। विनवूं लागले सायीसी ॥ १६५॥ बाबा पोत खेळूं लागली मरी। इथाचा विचार कांहीं तरी। का तुम्हीं आमच्या नगरीं। असून काय उपयोग ॥ १६६ ॥ महाराज म्हणती त्याप्रत। जातील माणसें सात। या आपुल्या शिरडींत।

मग न राहे मरी ती ॥ १६७ ॥ बोले तैसें झालें सत्य । मेलीं माणसें अवघीं सात । केवढें बाबांचें सामर्थ्य । आधीच भाकित केलें तिचें ॥ १६८॥ आतां ऐका पुढील प्रकार । तुम्हीं श्रोते उदार धीर । दास गणू मी तुमचे पोर । बोबड्या शब्दें सांगतसें ॥ १६९ ॥ कोंड्या सुतार नामें एक । भक्त होता परम भाविक । त्यावरी बाबांचें प्रेम देख । होतें आगळें सर्वाहूनी ॥१७०॥ बाबा म्हणती कोंड्यासी । तुवां जावें खळवाडीसी । आग मधल्या गंजीसी । लागली ती विझ-वावया ॥१७१॥ कोंड्या झाला घाबरा । खळ्यास गेला करून त्वरा । तेथें तपास करून पुरा । आलासे माघारी ॥ १७२ ॥ बाबा उगीच कांहीं तरी । सांगुन मजला त्रास भारी । दिधला दुपारच्या अवसरीं । पाय माझे पोळले ॥ १७३ ॥ बाबा म्हणती ऐक जरा । माझी नोहे असत्य गिरा । वळून पाहे माघारा । तो पाहा धूर निघाला ॥१७४॥ सुडयांसी सुडया लागल्या दाट । मधल्या सुडीनें घेतला पेट । गांवांत झाला बोभाट । पेटलीसे खळवाडी ॥ १७५ ॥ दिवस होता उन्हाळ्याचा । त्यांत समय दुपारचा । प्रभंजन सुटला जोराचा । प्रलयवातासमान ॥१७६ ॥ कडकडा झाडें मोडती । छपरें गगनीं उडूं पाहती । वाचटळीस नाहीं गणती । दुर्धर प्रसंग ओढवला ॥१७७ लोक अवघे घाबरले । साइबाबाकडे आले । घट्ट तयांचे पाय धरिले । रडूं लागले दीनवत् ॥ १७८ ॥ हे साईबाबा कृपारासी । आग लागली खळवाडीसी । आतां आमची गति कैसी । सांगा होईल महा-राज ॥ १७९ ॥ खळवाडी आमुचा प्राण । खळवाडी आमुचें जीवन । ती अवघी जळाल्या जाण । अन्न न मिळेल आम्हांतें ॥१८०॥ मुलें माणसें मरतील जाण । करूनियां अन्नअन्न । गुरेंही सोडतील प्राण । त्यावांचून दयाळ ॥ १८१ ॥ यासाठीं कांहींतरी । उपाय सांगा

झडकरी । तुम्ही साक्षात श्रीहरी । भूतभविष्य जाणतां ॥ १८२ ॥ त्या जनांच्या विनंतीस । देऊनी मान पुण्य राशी । गेले त्यों खळ्यासी । आग विझवाया कारणें ॥ १८३ ॥ गंजी जी होती पेटली । ती महाराजांनीं अवलोकिली । धार पाण्याची फिरविली । भोंवतालीं गंजीच्या ॥ १८४ ॥ ही एवढीच जळेल । दुसरीस न धक्का लागेल । हा अग्नीचा भाग सकळ । विझवूं नका कोणी हसी ॥ १८५ ॥ जैसें महाराज बोलले । तैसेंच पुढें प्रत्यया आलें । जन अवघे आनंदले । थोर महती बाबांची ॥१८६॥ अवघ्या गंजी शेजारच्या । रक्षण केल्या असती भाग्या । अंमल आपला अग्नीच्या । वरही ज्यांनीं चालविला ॥१८७॥ सत्पुरुषांच्या आज्ञेनें । पंचभूतें वागती सत्य । सच्चिदानंद रमानाथ । सेवें तिष्ठत ज्यांच्या ॥१८८॥ अस्तमानाचे समयासी । मंडळी आली दर्शनासी । नानासाहेब पुण्यराशी । चिटणीस नगर जिल्ह्याचे ॥ १८९ ॥ चांदोरकर दर्शनास । गेले बाबांच्या मशीदीस । आपण होऊन त्यास । महाराज बोलले तें ऐका ॥ १९० ॥ हे माझे गुणनिधाना । गोविंदात्मज नारायणा । चांदोरकर कुलभूषणा । पहा हे लोक मनामधीं ॥ १९१ ॥ आज या भागचंदाची । गंजी जळाली अर्ध याची । पाड पर्वाकी त्यांचे आमुची । तोटा झाला म्हणोनी ॥१९२॥ लाभ हानी जन्ममरण । हें ईश्वराचे आधीन । परी हे कैसे अंधजन । विमग्नांनीं तयास ॥१९३॥ लाभ होतां आनंदावें । हानी होतां कां रडावें । माझे माझें म्हणावें । अर्थ काय यांमध्यें ॥१९४॥ गंजी कोठली मालक ज्यांची । ती मुळींच कडब्याची । उत्पत्ति ती तिचेची । झाली बीजापासूनी ॥ १९५ ॥ तें बीज धरिलें भूमीनीं । पाऊस पाडिला मेघांनीं । रवीनें अमृतकरांनीं । आणिलें त्या आकारा ॥ १९६ ॥

ऐसे याचे मालक तीन । पृथ्वी सूर्य सजल घन । हा माझें माझें म्हणोन । उगाच टिऱ्या बडवितसे ॥१९७॥ ती अग्नीनें भक्षिली । सूर्याची सत्ता अधिक झाली । पृथ्वी बिचारी होरपळली । मात्र अग्नितापानें ॥ १९८ ॥ मेघासी याची दाद नाहीं । तो घमेंडानंदन पाही । चंचल सौदामिनी ठायीं । रममाण जाहला ॥ १९९ ॥ जे स्त्रियाशीं लंपट अती । असती कीं मूढमती । ते कधीं ना जाणती । आपुल्या लाभ हानीतें ॥ २०० ॥ तो त्यामुळें तगीच बसला । सूर्यानें दावा साधिला । भूमिपासूनी हिसकूनी नेला । माल आपुला म्हणोनी ॥२०१॥ जगांत जितक्या वस्तु असती । त्यांची ऐशीच उत्पत्ती । मालक तियेचे निश्चितीं । नाहीं आपण सर्वदा ॥२०२॥ तूं तरी कांहीं सांग याला । हा उगीच करितों दुःखाला मघापासून त्रास दिला । यानें मला अनिवार ॥ २०३ ॥ एक्या हातीं ईश्वर देतो । सर्वचि दुसऱ्या हातीं नेतो । प्राण सुखदुःखा-कारण होतो । अज्ञात गांठीं म्हणोनियां ॥ २०४ ॥ जा शेटजी घरा स्वस्थ । फायदा दुसऱ्या व्यापारांत । होईल तुमचा निश्चित । येईल नुकसान भरून हें ॥२०५॥ ऐसा वर्षतां बोध घन । अवघे आनंदले पूर्ण । चिटणीसानीं केलें वंदन । सद्गतीत जाहले ॥२०६ ॥ हे भक्त चकोर पूर्ण चंद्रा । हे अपरोक्ष ज्ञानाच्या समुद्रा । द्यावी मसी ज्ञान मुद्रा । जेणें अज्ञान निरसेल ॥२०७॥ देव कोण कैसा असे । तो कोठें वसतसे । काय केलिया भेटतसे । हें सांग मजप्रति ॥२०८॥ जग हें मुळींच नश्वर । मग कां करावा हा व्यापार । ह्याचें वर्म फोडोनी सत्वर । मजलागीं सांगावें ॥२०९॥ ऐसें ऐकतां चिटणीसांचें । भाषण बोलले महाराज साचें । विवेचन ह्या गोष्टीचें । करीन पुढें एके दिनीं ॥ २१० ॥ जैसे चांदोरकर भक्त पुरे । तैसेच

गणेश विष्णु बेरे । त्यांचें कथानक आदरें । ऐका थोडें सांगतों ॥२११॥ हे जिल्ह्याचे तपासणीदार । असती शेतकी खात्यावर । ते मुद्दाम शिरडीवर । आले दर्शन घ्यावया ॥२१२॥ बाबांचें करितां वंदन । बोलले ते त्यांकारण । तुम्हीं आतांच येथून । निघून जावें शीघ्रगती ॥२१३॥ वेळ थोडाहि करूं नका । क्षण एकही राहूं नका । भरधांव आपुला तांगा हांका । कोपरगांवा शीघ्र जावें ॥२१४॥ ठेवून विश्वास महाराज वचनीं । बेरे निघाले तेथोनी । त्यांच्या तांग्या मागोनीं । येत होता दुसरा तांगा ॥२१५॥ त्या दुसऱ्या तांग्यांत । जे बसले होते गृहस्थ । ते बोलले बेऱ्याप्रत । थांबा आम्हां येऊं द्या ॥ २१६ ॥ तांगा चालवा हळहळू । नका हरिणासारखे पळू । अजून आहे बहुत वेळु । स्टेशनावरी गाडीस ॥ २१७॥ बेऱ्यानीं न त्या मान दिला । तांगा भरधांव हांकिला । गोदाप्रवाह ओलांडिला । पोहोंचले असती स्टेशनासी ॥ २१८ ॥ मागोमाग ऐकिली मात । लुटला तांगा रस्त्यांत । चोरट्यांनीं लवणांत । कोपरगांव रस्त्यावरी ॥ २१९ ॥ मारहाण फार झाली । संपत्ती अवघी लुटोनी नेली । पोलीस मंडळी निघाली । तपासासी तयाच्या ॥२२०॥ हें ऐकतां अशुभवृत्त । बेरे म्हणती हे सद्गुरुनाथ । संकटांतूनीं या पोराप्रत । तुम्हीं सत्य वांचविलें ॥२२१॥ एक हिरण्यकेशी ब्राह्मण । वाशिष्टगोत्री ज्ञान संपन्न । जयाचें तें वसती स्थान । पुण्यपट्टण जाणा हो ॥२२३॥ तो असे थोर अधिकारी । श्रीमान सदय अंतरीं । निष्ठा ब्रह्मकर्मावरी । जयाची ती अत्यंत ॥ २२४॥ म्हणें घ्यावें धाराग्र । परी कांता पावती मरण । कांतेविण वांचूनी अग्निहोत्र कैसे घडे ॥ २२४ ॥ पोटीं नसे संतती । घरीं अग्नि

संपत्ती । लग्न कराया नेघे मती । पन्नासी भरली म्हणूनियां ॥२२५॥ त्यास म्हणती कित्येक जन । करा हो तुम्हीं दुसरें लग्न । प्रयत्नांतीं नारायण । पावतो ऐसें शास्त्र ॥ २२६ ॥ बागाईताचा मनीं आस । परी न खणी विहिरीस । वा न घेई पाटास । मग कैसें घडावें तें ॥२२७॥ म्हणून आमुची प्रार्थना । साहेब आपण मनीं आणा । वधु पाहून सुलक्षणा । लग्न करून घ्यावें हो ॥ २२८ ॥ तैं ते म्हणती हरीपंत । आतां संततीची आस व्यर्थ । हांसू मात्र जगतांत होईल लग्न करतांच ॥२२९॥ वयास आली पन्नासी । म्हातारपणीं संततीसी । पाहीन ऐसा पुण्यराशी । मी नव्हें हो खचीत ॥२३०॥ जरी ऐकदां सांगेल संत । मशी लग्न करण्याप्रत । तरी लग्नाचा योग सत्य । घडून येईल निश्चयें ॥ २३१ ॥ ऐसे बोलून जनासी । हरीपंत आले शिरडीसी । जातां सायीदर्शनासी । बाबा बोलूं लागले ॥२३२॥ हरीबा तूं सभाग्य नर । लग्न करीरे सत्वर । पुत्र देईल शंकर । इच्छा पुरेल मनींचीं ॥२३३॥ उगीच शंका न वाही मनीं । तुझा सर्वस्वें आहे ऋणी । भोलानाथ शूलपाणी । कर्पूरगौर परमात्मा ॥२३४॥ तें ऐकतां जन हरिखले । म्हणती आतां बरें झालें । संतानुमोदन मिळालें । लग्न दुसरें करावया ॥२३५॥ तरी म्हणती हरीपंत । ज्योतिषाचें पाहिजे मत । तें मिळाल्या निश्चीत । विवाह करीन दुसरा ॥२३६॥ ऐसें बोलून नगरांत गेले । तो पुण्याहून पत्र आले । कीं एक ज्योतिषी येथें भले । आले असती विद्वान ॥२३७॥ एवंच मत ज्योतिषाचें । पडलें तेधवां अनकूल साचें । लग्न झालें पंताचें । साईकृपेकरूनी ॥२३८॥ ते स्त्रीपुरुष तरुच्युत । साईकृपा हा वसंत । फल त्या वृक्षा येईल सत्य । शंका मुळींच घेणे नको ॥२३९॥ जोंधळा आला पोटरींत । वरी पाऊस पडला

बहुत । हबाही शुद्ध अत्यंत । मग कणसाची शंका कां ॥२४०॥ त्या हरीपंत द्विजाची । निष्ठा सायीपदीं साची । योग्यता थोर यांची । नमन माझें तयातें ॥२४१॥ बाबा साई कृपाराशी । ज्ञाननभींचा पूर्ण शशी । चिंतामणी भाविकासी । चिंतिलें फळ देणार ॥२४२॥ नित्य स्मरता त्या साईपदा । हरतील अवघ्या आपदा । सीतावेदो त्या तूं कदा । विसरूं नको स्वप्नींही ॥२४३॥ तरीच होईल कल्याण । आपुलें उभयतांचें जाण । साई महाराज कृपाघन । वर्षेल आपणावरी ॥२४४॥ जे या साईचरित्रासी । श्रवण करितील प्रेमेंसी । त्यास रक्षील हृषीकेशी । सत्यवचन त्रिवाचा ॥२४५॥ पुढील अध्यायीं कथा गहन । त्रिवर्गासी उपदेशकथन । तें उपदेश करितां श्रवण । पुरुषार्थ चारी साधतील ॥२४६॥ दास गणूचे बोबडे बोल । तुम्हीं ऐका हो भक्तप्रेमळ । साईचरणीं अर्पितां भाळ । इच्छा पुरतील मनींच्या ॥२४७॥ याचें जो करी पारायण । त्याचे पापा होय दहन । पाठी राखील नारायण । तयाची तो सर्वदा ॥२४८॥ स्वस्तिश्री भक्तलीलामृत । रम्य बाबांचे पवित्र चरित्र । हें केवळ परमामृत । सेवा सेवा गणू म्हणे ॥ २४९ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु । शुभंभवतु ॥ ॥ ॥

॥ इति एकत्रिंशोऽध्याय : समाप्तः ॥

# अध्याय ३२ वा.

श्रीगणेशाय नमः ॥ हे चित्स्वरूप सर्वेश्वरा । आनंदमूर्ते उदारा । स्वयं प्रकाशा निर्विकारा, सर्वावस्थातीत तूं ॥ १ ॥ ऐसें तुझें अगम्य रूप । मी न जाणें मायबाप । जेथें वेदही साक्षेप । नेति नेति म्हणतसे ॥ २ ॥ वशिष्ठ भृगू पाराशर, जे ज्ञान नर्भीचे भास्कर। यांनाही तुझा न लागला पार । मग मी तेथें काजवा किती ॥ ३ ॥ हें असो दे कांहीं देवा । परी मी तुझा करितसे धांवा । मम मनीं वास करावा । हा ग्रंथ वदविण्यास्तव ॥ ४ ॥ तथा शिर्डी ग्रामासी । आले साईच्या दर्शनासी, नानासाहेब पुण्यराशी । दुसरे नाना निमोणकर ॥ ५ ॥ चांदोरकरांनीं पदीं माथा। ठेवून बोलले तत्वतां। हे साई महाराज समर्था, पुरे आतां हा संसार ॥ ६ ॥ अवघीं शास्त्रें संसाराशीं । निःसार आहे म्हणती ऐशी, ह्या प्रपंचरूप शृंखलेसी, तोडीं सत्वरी दीनबंधो ॥ ७ ॥ जों जों सुखाची हांव धरावी, तों तों दुःखाची स्वारी व्हावी । आशा सटवी नाचवी ठाईं ठाईं आम्हांला ॥ ८ ॥ शोधूं जातां संसारांत । सुखाचा न लेश सत्य, मी कंटाळलों त्याप्रत, नको संबंध तयाचा ॥ ९ ॥ ऐसें ऐकतां त्यांचें भाषण । बाबा बोलले हांसून । हें भलतेंच वेड्या मोहक ज्ञान । कोठून तुज उदेलें ॥ १० ॥ तुझी आहे सत्य गिरा। परि चुकतोस वेड्या जरा । यावदेह तावत् खरा । आहे संसार पाठीशीं ॥ ११ ॥ तो न चुकला कोणासी, मग तूं त्या कैसा सोडिसी । तो तोडितां नये मशीं । मीही त्यांत गुंतलों ॥ १२ ॥ संसाराचीं रूपें अनेक, तीं मी सांगतों तुज देख । देहावरी आहे झाक । पहा तया संसाराची ॥ १३ ॥ काम मोह मद मत्सर। यांचा जो का परस्पर । संबंध तोही संसार, आहे बापा शिष्योत्तमा ॥१४॥ डोळे पदार्थ पाहती । कर्ण ध्वनीतें ग्रहण करिती । रसना रसातें

सेविती । याचेंही नांव संसार ॥ १५ ॥ मनाचे जे जे व्यापार, त्याचेंही नांव संसार । शारीर धर्म साचार । अवघे संसाररूपी वा ॥ १६ ॥ स्वरूप या संसाराचें । मिश्रण दोन वस्तूंचें । तें हें संसारबंधन साचें । तुटलें नाहीं कोणास ॥ १७ ॥ दारा पुत्र कन्यादिकासी । संसार म्हणती निश्चयेसी । तो मात्र ओंगळा तुशी, वाटूं लागला सांप्रत ॥ १८ ॥ दारा पुत्र कन्या जाण । बंधू भाचे पुतणे स्वजन । यांच्या त्रासें सेविलें रान । परी न सुटे संसार हा ॥ १९ ॥ ऐसें वदतां गुरुवर । काय बोलती चांदोरकर । हा शेवटला संसार । नको बाबा मात्र मशीं ॥ २० ॥ या शेवटल्या संसारीं । दुःख होतें नानापरी । वरले संसार निर्धारीं । अवघे ईश्वरनिर्मित ॥ २१ ॥ त्यां न कोणाचा उपाय चाले । ते पाहिजेत अवघे केले । शेवटल्यास मात्र चिटलें । मन सोडीव त्यांपासून ॥२२॥ तई बाबा म्हणती हांसत । तो तुझा तूंच केला निर्मित । मग आतां त्याप्रत । कंटाळून काय होतें ॥ २३ ॥ संचित क्रियमाण पूर्वींचें । देह प्रारब्ध फळ त्याचें । हेंच देह प्रारब्ध जन्माचें । आहे मूळ कारण ॥ २४ ॥ तें देह प्रारब्ध भोगिल्याविण । न सुटे कवणा लागून । तें भोगण्या कारण । प्राणी जन्म पावती ॥ २५ ॥ गरीब मध्यम श्रीमान । प्रापंचिक ब्रह्मचारी जाण । वानप्रस्थ संन्यासी पूर्ण । उच्च नीच अवघे ॥ २६ ॥ घोडा बैल कोल्हा मोर । व्याघ्र गेंडा तरस घार । श्वान बिडाल सूकर । चित्र सर्प मुंग्या पिसा ॥ २७ ॥ ह्या अवघ्यांच्या अस्तित्वासी । प्राण कारण निश्चयेसी । तो प्राण अवघ्यापाशीं । आहे एकसारखा ॥२८॥ मग बाह्य स्वरूपी भिन्नत्व । कां दिसावें जगतांत । याचा विचार मनांत । केलास कां त्वां कधीं तरी ॥ २९ ॥ याचा विचार करूं जातां । ऐसें कळों येईल

तत्वतां । कीं हें संचित क्रियमाण सत्ता । म्हणोन प्राणी भिन्न भिन्न ॥ ३० ॥ हें झालें वर्गीकरण । जैसा वर्ग तैसें लक्षण । मग त्या स्थितीस कंटाळून । काय होतें शिष्योत्तमा ॥ ३१ ॥ व्याघ्र सेविती मांस । सूकर सेविती विष्टेस । तरस पुरलेल्या प्रेतास । देह स्वभावें उकरीतसे ॥ ३२॥ कोंवळ्या कमल पत्रास । सेविताती राजहंस । घारी गिधाडें सडक्यास । देह स्वभावें सेविती ॥३३॥ जैसी योनी तैसी कृति । ही जगाची रीत निश्चितीं । त्यांतची देह प्रारब्ध भोगिती । कमी जास्त मानानें ॥३४॥ पहा कित्येक पंचानन । स्वेच्छें सेविति कानन । कित्येकांस दरवेशी बांधून । दारोदार हिंडविती ॥ ३५ ॥ धनिकाश्रित जे कां श्वान । ते बैसती गाद्यांवरून । कित्येक गांवांत भटकून । तुकड्यासाठीं घोंटाळती ॥ ३६ ॥ कित्येक गाईंस घास दाणा । अंबोण पेंड प्रकार नाना । तृणही न मिळे कित्येकींना । कित्येक उकीरडा फुंकिती ॥३७॥ या अधिक उण्याचें कारण । एक देह प्रारब्ध जाण । तें अवघें भोगिल्याविण । कालत्रयीं सुटेना ॥३८॥ तोच न्याय मानवांत । एक गरीब एक श्रीमंत । एक सभाग्य एक अनाथ । एक भिक्षा मागतसे ॥३९॥ एक उडवी घोडे गाड्या । एकाच्या त्या महाल माड्या । एक जागे-वरी उघड्या । दिगंबर निजतसे ॥४०॥ कित्येकांस मुलें होती । कित्येकांची होऊन जाती । कित्येक वांझ रहाती । कित्येक त्रासती संततीला ॥४१॥ ऐसें ऐकतां समर्थ वचन । चांदोरकर कर जोडून । म्हणती हें कबूल मजकारण । परी सुखदुःख व्हावें कां ॥४२॥ सौख्य होतां हर्ष वाटे । दुःख होतां हृदय फाटे । सुखदुःख हें भेटे । क्षणक्षणा संसारीं ॥४३॥ म्हणून ही सुखदुःखाची । खनी आहे हांच साची । तीच त्यागितां दुःखाची । नोहे बाबा कदा बाधा॥४४॥

ऐसें ऐकतां शिष्याचें भाषण । बाबा बोलले साचें । अरे सुखदुःख हेंच भ्रांतीचें । आहे पटल केवळ ॥ ४५ ॥ प्रपंचांतील जें सुख । तें तें नव्हे खरें देख । बळेंचि त्याला प्रापंचिक । सत्य येती मानूनी ॥४६॥ पहा देह प्रारब्धें एकाग्रत । खाया मिळे पंचामृत । एकास वाळले तुकडे सत्य । एकास मिळे कळणा कोंडा ॥ ४७ ॥ तुकडे कळणा कोंडेवाला । दुःखी समजे आपणाला । पंचामृताचा धनी मला । म्हणे कांहीं कमी नसे ॥ ४८ ॥ सेविलिया मधुर पक्वान्न । अथवा कळणा कोंडा जाण । या दोहींचें अधिष्ठान । तृप्ति जठरस्थ अग्नीची ॥ ४९ ॥ शाला दुशाला जरतारी । घेऊन कोणी नानापरी । भूषविती तनु साजिरी । कोणी पांघरती वल्कलें ॥५०॥ शाल दुशाल वल्कलांचें । आहे प्रयोजन एकचि साचें । रक्षण करणें तनूचें । कांहीं न या पलीकडे ॥ ५१ ॥ मग या सुखदुःखाचा उपयोग केवळ मानण्याचा । हें मानणें तिमिर साचा । आहे घातक मानवांशीं ॥ ५२ ॥ या सुखदुःखाचे तरंग उठती । जे जे कांहीं आपुल्या चित्तीं । ती अवघी होय भ्रांती । मोह तिचा वाहूं नको ॥५३॥ येथें शंका येईल ऐसी । तरंग अवघे उठण्यासी । कांहीं तरी मूळासी । अन्य वस्तु पाहिजे ॥ ५४ ॥ लहरी नसती जलाविण । प्रकाश न दीपावांचून । तैसें या तरंगा कारण । कोणी तरी पाहिजे ॥ ५५ ॥ लोभ मोहादि षड्रिपु देख । हे तरंगासी उत्पादक । ते तरंग सकळ मोहक । असत्या सत्य भासवी ॥ ५६ ॥ धनिक हातीं सुवर्ण कडें । पाहून दरिद्री चरफडे । हें चरफडणें रोकडें । तरंग उठवी मत्सर॥५७॥ तें असावें मजपाशीं । ऐसें जें वाटे मानसीं । ह्या तरंगाचे उठा- णीसी । झाला लोभ कारण ॥ ५८ ॥ ऐशाच परी अवघें होतें । कोठवरी सांगूं तूतें । म्हणून आधीं षड्रिपूतें । जिंकिलें पाहिजे

शिष्यवरा ॥ ५९ ॥ मग त्या षड्रिपू शक्तींचा । नायनाट होतां साचा । लाग न साधे तयांचा । तरंग उठविण्या मानसीं ॥ ६० ॥ परी या षड्रिपूची । समूळ शक्ति न हरितां साची । गुलामत्वाच्या जागीं त्यांची । करीं अवघ्यांची योजना ॥ ६१ ॥ मग या सहा गुलामांवर । ज्ञानास करी जमादार । त्याच्याही वरी अधिकार । सद्विचार शक्तीचा ॥६२॥ मग या खोट्या सुखदुःखाची । बाधा न होय तुज साची । खऱ्या सुखदुःखाची । व्याख्या ऐक सांगतों॥६३॥ मुक्ति हेंच खरें सुख । जन्ममरण फेरा हेंचि दुःख । या व्यतिरिक्त दुसरी भ्रामक । आहेत बापा सुखदुःखें ॥ ६४ ॥ असो आतां या संसारीं । तुवां वागावें कैशापरी । हें मी सांगतों निर्धारीं । तिकडे अवधान द्यावें तुवां ॥ ६५ ॥ देह प्रारब्धानुरोधें । प्राप्त स्थिती तिच्यामध्यें । आनंद मानूनी रहावें बुधें । खोटी तळमळ करूं नये ॥ ६६ ॥ घरीं आलिया संपत्ति । आपण व्हावें नम्र अति । फळें येतां लीन होती । वृक्ष जैसे शिष्योत्तमा ॥ ६७ ॥ हें नम्र होणें चांगलें । परी न सर्वांठायीं भलें । दुष्ट दुर्जन ओळखिलें । पाहिजेत पुरे या जगतीं ॥६८॥ कां कीं धनिक नम्र होतां । यांना फावे तत्वतां । म्हणून दुष्टीं कठोरता । धरिली पाहिजे मानसीं ॥६९॥ साधु संत सज्जन । यांचा राखणें मान । लीन व्हावें लव्हाळ्याहून । त्यांचे ठायीं सर्वदा ॥ ७० ॥ श्रीमंती दुपारची छाया । हें न जावें विसरूनियां । धन मद अंगीं आणूनियां । न छळी कोणा निरर्थक ॥ ७१ ॥ आपुली प्राप्ति पाहून । दान धर्म करावा जाण । उगीच कर्ज काढून । उधळेपणा करूं नये ॥ ७२ ॥ प्रपंच जरी अशाश्वत । परी तें प्रारब्ध सत्य । तो प्रपंच करण्याप्रत । द्रव्य अवश्य पाहिजे ॥७३॥ शरीरीं जैसी आवश्यकता । आहे पित्ताची तत्वतां ।

तैसी प्रपंचीं ज्ञानवंता । आहे या धनाची ॥७३॥ अवश्य वस्तु जरी हें धन । परी त्यांतची न गोवीं मन । राहूं नको कदां कृपण। उदार बुद्धि असावी ॥ ७५ ॥ परी फाजील उदारता । नाहीं कामाची सर्वथा । द्रव्य अवघें संपून जातां । कोणी न विचारी मागुनी ॥७६॥ उदारपण उधळेपण । या दोघांची सांगड जाण । एके ठिकाणीं घातल्या पूर्ण । होईल बापा अनर्थ ॥ ७७ ॥ द्रव्य दानीं पहावें योग्यता । तैसीच त्याची आवश्यकता । याचा विचार तत्वतां करूनि हात सढळ करी ॥ ७८ ॥ पंगु अनाथ रोगग्रस्त । पोरकीं मुलें समस्त । एखादें सार्वजनिक । कृत्य योग्य द्रव्यदानासी॥७९॥ तैसीच योग्य विद्वाना । पाहून करी संभावना । अनाथ स्त्रीच्या बाळंतपणा । यथाशक्ति मदत करी ॥८०॥ अन्नदानाचे प्रकार तीन। विशेष नित्य कार्या कारण । विशेष जें कां अन्नदान । तें केव्हां करावें ॥ ८१ ॥ घरीं संपत्ति बहु आलिया । काळ अनुकूल असलिया । सदिच्छा मनीं झालिया । सहस्रभोजन घालावें ॥ ८२ ॥ तेथें उच्च नीच भेद नाहीं । तें चहूं वर्णीं श्रेष्ठ पाहीं । सुष्ट दुष्ट अवघेही । योग्य या अन्नदानातें ॥८३॥ भंडारा अथवा प्रयोजन । हे याचेच भेद पूर्ण । परी हें कर्ज काढून। करूं नये कदांही ॥८४॥ आतां नित्य अन्नदानासी । योग्य कोण सांगतों तुशीं । पांथिक तापसी संन्यासी । लंडी तापडी भुकेला ॥८५॥ मागुनियां कोरान्न । जे करिती विद्यार्जन । ऐशा मधुकऱ्या लागून । नित्यान्न घालावें ॥८६॥ लग्न मौंजी ऋतुशांति । सण व्रतोद्यापन निश्चितीं । या अवघ्या प्रसंगाप्रति कार्या कारण म्हणावें ॥८७॥ या कार्या कारण प्रसंगास । वाहणें इष्ट मित्रास । आप्त सखे सोयऱ्यास । आदरें द्यावें अन्न बापा ॥८८॥ हे अन्नदानाचे प्रकार । तुज

कथिलें साचार। योग्या योग्य विचार। तोही पैं कथन केला ॥८९॥ वस्त्रदानाची हीच स्थिती। हें विसरूं नको कल्पांती। आपुल्या अंगीं असल्या शक्ति। पर पीडा नित्य निवारावी ॥९०॥ हातीं कांहीं असलिया सत्ता। तिचा दुरुपयोग न करणें सर्वथा। न्यायासनीं बैसतां। लांचलुचपत घेऊं नको ॥ ९१ ॥ ज्या कार्याची जबाबदारी। नेमिली असेल आपुल्या शिरीं। तें कार्य उत्तम करी। वाहून काळजी तयाची ॥ ९२ ॥ बाजवीपेक्षां फाजील देख। न करावा पोषाख। अहंपणाची झांक। आणून तोरा दावूं नको ॥९३॥ कांहीं नसतां कारण। कोणाचा न करी अपमान। शठ दुष्ट या ओळखून। सदा असावें अंतरीं ॥९४॥ कन्या पुत्र दास दासी। ह्या देह प्रारब्धें प्राप्त तुर्शी। झाल्या असती तयाशीं। वागवावें प्रीतीनें ॥९५॥ दारा पुत्र कन्या स्वजन। या माझें माझेंचि म्हणून। मनीं वाहतां अभिमान। कारण जन्ममरणासी ॥९६॥ कां कीं हें देह प्रारब्ध सकल। येथेंचि अवघें सरेल। त्याचा लेशही न उरेल। अंतीं संगति यावया ॥९७॥ या अवस्थांची महति। आहे याच जन्मा पुरती। मागल्या जन्मीचे निश्चितीं। कोठें आहे गणगोत ॥९८॥ ते ज्या त्या जन्मींच सरून जाते। वासना मात्र बद्ध करिते। तीच वासना कारण होते। पुढलिया जन्मासी ॥९९॥ म्हणून या स्वकीयांचा। खोटा मोह न वाही साचा। तरीच अक्षय सुखाचा। लाभ होईल तुजलागीं ॥१००॥ जैसे आपण धर्मशाळेंत। जातों क्षणेक रहाण्याप्रत। तात्पुरती सोय येथ। घेतों आपण करूनि ॥१०१॥ म्हणून त्या धर्मशाळेचा। मोह ना आपणा उपजे साचा। तोच प्रकार येथीचा। प्रपंच ही धर्मशाळा ॥१०२॥ ऐसें प्रत्येकानें वागावें। कर्तव्य आपुलें करावें। तें करीत असतां ओळखावें।

सच्चिदानंद ईश्वरा ॥१०३॥ पुत्र आपला आणि पराचा । निर्माणकर्ता एकचि साचा । परी आपुल्या पुत्राचा । भार स्थापिला आपुल्या शिरीं ॥१०४॥ म्हणून त्याचें संगोपन । करोनि उत्तम शिक्षण । द्यावें थोडें बहुत धन । त्यासाठीं ठेवावें ॥ १०५ ॥ परंतु मीच पुत्रास पोशिलें । मीच त्यास शिक्षण दिलें । मीच त्यासाठीं ठेविलें । धन ऐसें मानूं नको ॥ १०६ ॥ कर्तव्य आपण करावें । कर्तृत्व ईश्वरा द्यावें । फलही त्यासच समर्पावें । अलिप्त आपण रहावया ॥१०७॥ ज्ञानाचा करून उपयोग । बरें वाईट जाणे सांग । जे जे बरें त्यासी अंग । देऊन वाईट टाकावें ॥१०८॥ उत्तम कार्य हातीं घ्यावें । तें तें नाना प्रयत्नें शेवटास न्यावें । कीर्तिरूपें उरावें । मागें मरून गेल्यावर ॥१०९॥ अंगीं असावें कर्तृत्व । न रहावें निर्माल्यवत् । हाच पुरुषाचा पुरुषार्थ । किती सांगू तुजप्रती ॥११०॥ कर्तृत्व करितां अभिमान । वहावा बापा मनीं जाण । फल घेतांचि व्हावें लीन । अभिमान तो झुगारोनि ॥१११ ॥ जोंवरी जिवाचें अस्थित्व । तोंवरी त्या जपणें सत्य । मरण घडतां व्यर्थ । शोक त्याचा करूं नये ॥ ११२ ॥ कां कीं शोक करण्या पाहीं । तेथें जागा उरलीच नाहीं । सुज्ञांस न त्याचें वाटे कांहीं । मूर्ख मात्र करिती शोक ॥११३॥ पहा पांचाची उसनवारी । आणली होती आजवरी । ती त्यांची त्यांना निर्धारीं । परत केली प्राणानें ॥ ११४ ॥ वायू वायूंत मिळाला । तेज मिळालें तेजाला । ऐसीं आपआपलें ठिकाणाला । गेलीं निघून पंचभूतें ॥ ११५ ॥ शरीर भाग पृथ्वीचा । तो निरसम दृश्य साचा । म्हणोन तो शोक करण्याचा ॥ नाहीं विषय शिष्योत्तमा ॥११६॥ तैसेंच होतां मुलाचें जनन । हर्ष करीं न द्यावें मन । तो सृष्टीचा व्यवहार समजून । स्वस्थ रहावें नारायणा ॥ ११७॥

पहा पृथ्वी बीजा धारण करिती। घनवृष्टि करिती वरी। मग तो सूर्य आपुल्या करीं। मोडलागीं निपजवितो ॥ ११८ ॥ त्या मोडाचें होतां जनन। पृथ्वी सूर्य आणि घन। काय आनंद मानून। नाचूं लागती दश दिशा ॥ ११९ ॥ त्याचा मोठा वृक्ष होवो। अथवा आंजि जळून जावो। परी हर्ष शोक रिघावो। न करी त्यांच्या मानसीं ॥ १२० ॥ तैसें रहावें आपण। मग शोक दुःख कोठून। शोक दुःखाच्या अभावीं जाण। मुक्त स्थिति चांदोरकरा ॥ १२१ ॥ यांच्या पुढील जें कां कथन। तें मी पुढें सांगेन। एखादे वेळ तुज लागून। राही सावध निजकर्मी ॥ १२२ ॥ ऐसी एकोनि समर्थ वाणी। चांदोरकर आनंदले मनी। बाबांचे धरिले पाय दोनी। घट्ट मिठी मारूनियां ॥ १२३ ॥ नयनीं लोटल्या अश्रु-धारा। रोमांच उठले शरीरा। हे साई समर्थ उदारा। उद्धार माझा केला तूं ॥ १२४ ॥ बोधरूपीं वर्षतां घन। अज्ञान धुराळा बसून। गेला आमुचा आज पूर्ण। किती उपकार आठवूं ॥ १२५ ॥ ऐसाच हर्ष निर्माणकरा। झाला असे साजिरा। दोघेही आपुल्या घरा ॥ गेले वंदून बाबांतें ॥ १२६ ॥ सीता बेद्रे सांगूं किती बाबांनीं। जी कथिली नीति। भक्त चांदोरकराप्रती। ती मी वेडे कथिली तुला ॥ १२७ ॥ या नीतीचें पठण जो कोणी भाविक जन। करी नित्य भावें करून। त्यासी न होय भवबाधा ॥ १२८ ॥ स्वति श्रीभक्ति-लीलामृत। वर्षला हें बोधामृत। तें सेवा तुम्हीं समस्त। विनंति करी दासगणू ॥ १२९ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

## ॥ इति द्वित्रिंशोऽध्यायः समाप्तः॥

१७

# अध्याय ३३ वा.

श्रीगणेशायनमः॥ तूं त्रिगुणातीत त्रिगुणात्मक । तूं विश्वातीत विश्वव्यापक । तूं सच्चिदानंद वरदायक । सर्वारंभ आद्य तूं ॥ १ ॥ तूं शब्दातें उत्पादिता । शब्दही तूंच समर्था । तुजवेगळें करूं जातां । बोलणें अवघें खुंटतें ॥ २॥ तूं मंगलरूप मंगलकर्ता । मग अमंगलाची कशास वार्ता । तुझ्या पदीं बांधलों असतां । अविश मातें स्पर्शेना ॥ ३ ॥ असो कांहीं दिवस गेल्यावर । ते बाबांचे शिष्य चांदोरकर । आले दर्शनार्थ साचार । तया शिर्डी ग्रामासी ॥ ४ ॥ करून पदाचें वंदन ॥ बोलते झाले नारायण । बाबा आतां पुढील कथन । मजलागीं कथन करा ॥ ५ ॥ ऐसें ऐकतां शिष्यवचन । बाबा आनंदले पूर्ण । म्हणती आतां अवधान । द्यावें माझिया बोलासी ॥ ६ ॥ सुखदुखाचिये अंतीं । जरी आहे मुक्तिस्थिति । ती स्थिति येण्याप्रती । वागणें कैसें सांगतों तें ॥ ७ ॥ देहप्रारब्ध भोगितां । सदसद्विचारशक्ति सत्ता । जागृत ठेवावी सर्वथा । तिशीं फांटा देऊं नये ॥ ८ ॥ सहज गतीनें जें जें घडे । तें तें देहप्रारब्ध रोकडें । कर्म करूनी जें जें घडे । तें न देहप्रारब्ध ॥९॥ पहा कित्येक चोऱ्या करिती । कृतकर्म शिक्षा भोगिती । हें शिक्षा भोगणें निश्चिती । नोहे देहप्रारब्ध ॥१०॥ जहर पितां घडे मरण । हें नोव्हे देहप्रारब्ध जाण । हें कृतीचें फळ पूर्ण । कर्त्यालागीं मिळतसे ॥११॥ नायनाट करून धन्याचा । कारकून होय मालक साचा । हाही देहप्रारब्धाचा । नोहे भाग शिष्योत्तमा ॥१२॥ मग तो कारकून झाल्या धनी । राहे सदा चैनींनीं । गाड्या घोडे उडवोनी । म्हणे मी सुखी झालों॥१३॥ त्यानें जो धन्याचा केला घात । तें जोडिलें पाप सत्य । हेंच पुढील जन्माप्रत । संचित क्रियमाण होईल ॥ १४ ॥ संचित क्रियमाण प्रमाणें । जन्म होईल त्याकारणें । हें जाणती शहाणे । नाहीं काम

मूखाचें ॥१५॥ शिवाय देहप्रारब्धेंकरून । जें लाधलें होतें कार. कूनपण । तें त्यानें शिल्लक जाण । ठेविलें पुढिले जन्मासी ॥१६॥ एवंच पुढील जन्माची । केली तयारी त्यानें साची । जन्ममरण यात्रा अशाची । कोठून सांग चुकेल ॥१७॥ पहा कितीएक पदवी-धर। आरूढती अधिकारावर। कित्येक हिंडून जगभर । देती नुसतीं व्याख्यानें ॥१८॥ कित्येक योगी होती । कित्येक दुकानें घालिती । कित्येक पोरें पढविती । होऊनी शिक्षक शाळेमध्यें ॥ १९ ॥ योगी शिक्षक दुकानदार । व्याख्याता अधिकारी नर। अवघे आहेत पदवी-धर । प्रयत्न अवघ्यांचा सारखा ॥२०॥ हा भिन्न भिन्न व्यवसाय मग । कां व्हावा अशीं सांग । अरे हा देहप्रारब्धयोग । नाहीं फळ प्रयत्नाचें ॥ २१ ॥ ऐसें वदतां गुरुवर । काय बोलती चांदोरकर । चोरी करून होतां चोर । मात्र म्हणावें कर्मफळ ॥ २२ ॥ आणि देहप्रारब्ध येथें मात्र । म्हणावें कां सांगा त्वरीत । हेंही कर्मजन्य फल सत्य । कां बाबा म्हणूं नये ॥२३॥ ऐसें वदतां तो प्रेमळ भक्त। बोलते झाले साईनाथ । तें ऐका सावचित्त । ओवे वेळ दवडूं नका ॥२४॥ हे चांदोरकर कुलभूषणा । महासज्जना नारायणा । ह्या भलत्याच वेड्या कल्पना । काढून मज विचारिसी ॥ २५ ॥ पहा कित्येक खरे चोर । असून सुटती सत्वर । पुरावा न होत त्यांचेवर । हें देहप्रारब्ध तयांचें ॥२६॥ एक चोर तुरुंगांतरी । एक चोर असुनी सावाकारी । मग येथ कृत्यफल निर्धारीं । कोठें गेलें सांग पां ॥ २७ ॥दोघांचें एक कृत्य । एक सुटे एक शिक्षा भोगित, म्हणोनी आहे कृत्यातीत । देहप्रारब्ध नारायणा ॥ २८॥ परि त्या सुटलेल्या चोराचें । पाप न जाय कधीं साचें । तें पुढलीया जन्माचें । होईल सत्य कारण ॥२९॥ ह्मणून आतां सांगणें तुशीं । भोगितां

१४२

देहप्रारब्धाशीं । जागृत ठेवावें नीतीसी । म्हणजे कार्य होईल ॥३०॥ सज्जनांची करणें संगत। बसावे त्यांच्या मंडळींत । दुष्ट दुर्जन अभक्त, ह्यांची साउली नसावी ॥ ३१ ॥ अभक्ष्याभक्ष करूं नये । वितंडवादीं पडूं नये। खोटें वचन देऊं नये। कवणासही कदाकाळीं ॥३२॥ एकदां वचन दिल्यावरी । निमूटपणें खरें करी। वचनभंगीं श्रीहरी, दुरावेल नारायणा ॥ ३३ ॥ काम शरीरीं संचरतां । रमावें स्वस्त्रीशीं सर्वथा । पाहून पराची सुंदर कांता । विकारकरीं न धावें मन ॥३४॥ काम शुद्ध स्वस्त्रीशीं । परि सदा न सेवी तयासी । कामलालूप मानवासी । मुक्ति मिळणें अशक्य ॥३५॥ हा काम मोठा रे खंबीर । न होऊं देत चित्त स्थिर । षड्रिपूंत याचा जोर । सर्वांहून आगळा ॥ ३६ ॥ म्हणून ठेवून प्रमाण । करावें कामाचें सेवन। विवेकाचें लोढणें जाण । कंठी त्याच्या बांधावें ॥ ३७ ॥ कामास वागवावें आज्ञेंत । आपण न जावें त्याच्या कह्यांत । ऐसें जो वागे सत्य । तोच सुज्ञ समजावा ॥ ३८ ॥ देहप्रारब्ध भोगण्याप्रत । षड्रिपूंची जेवढी गरज सत्य । तितुक्यापुरता तयाप्रत । मान द्यावा शिष्योत्तमा ॥३९॥ आशा मोक्षाची अंतरीं । मोह व्हावा परमार्थाचा ॥४०॥ दुष्कृत्यांचा करी मत्सर । भक्तिभावें परमेश्वर । आपला करी साचार । जागा मदा देऊं नको ॥४१॥ सत्पुरुषांच्या ऐकणें कथा। चित्ताची ठेवी शुद्धता । मान राखणें ज्ञानवंता । आपुल्या जनकजननीचा ॥४२॥ सहस्त्र तीर्थांचे ठिकाणीं। एक मानावी निज जननी । पिता आराध्य दैवत म्हणूनी । वंदन त्याचें करावें ॥ ४३ ॥ आपुलें जे कां सहोदर । प्रेम ठेवी तयांवर । भगिनींना अंतर । शक्ति असल्या देऊं नको ॥ ४४ ॥ पत्नीस प्रेमें वागवावें । परि स्त्रैण कदा न व्हावें । तिचें अनुमोदन घ्यावें । फक्त गृहकार्यांत ॥४५॥

आपुल्या पुत्रस्नुषेंत । विपट पाहूं नये सत्य । तीं असतां एकांतांत । तेथें आपण जाऊं नये ॥ ४६ ॥ अपत्यासी न थट्टा करणें । तीं मित्रांचीं लक्षणें । नोकरासी न सलगी करणें । कन्याविक्रय करूं नको ॥ ४७ ॥ द्रव्य अथवा पाहून वतन । जरठास न करीं कन्यादान । असावा जामात सुलक्षण । कन्येस आपुल्या शोभेलसा ॥४८॥ हे पुरुषधर्म कथिले तुशीं । ऐसा जो वागे तयाशीं । बद्धस्थिति न बाधे निवशी । सदाचारी वर्तल्या ॥ ४९ ॥ निज पतीची करणें सेवा । हा स्त्रियांचा धर्म बरवा । तोच त्यांनीं आदरावा । अन्य धर्म नसे त्यां ॥ ५० ॥ पती हाच स्त्रीचा देव । तोच तिचा पंढरीराव । पतीपदीं शुद्ध भाव । ठेवूनी रहावें आनंदें ॥ ५१ ॥ पतीकोपीं नम्रता धरी । प्रपंचांत साहय करी । तीच होय धन्य नारी । गृहलक्ष्मी जाणावी ॥ ५२ ॥ ठेवूनी पतीशीं दुःश्चित । जी आचरे नानाव्रत । ती पापिणी कुटला सत्य । तोंड तिचें पाहूं नये ॥ ५३ ॥ स्त्रियांनीं विनय सोडूं नये । छछोर चाळे करूं नये । परपुरुषाशीं बोलूं नये । कोणी नसतां त्या ठायीं ॥ ५४ जरी आपुला सहोदर । तरी तो पुरुष आहे पर । म्हणुनी त्यासीं साचार । एकांत स्त्रीनें करूं नये ॥ ५५ ॥ या स्त्रीदेहाची विचित्र स्थिती । तो अनीतीचा भक्ष्य निश्चितीं । ह्मणून सावधगिरी अती । ठेविली पाहिजे शिष्योत्तमा ॥ ५६ ॥ शेळीं भक्ष्य लांडग्याचें । ह्मणून तिला कुंपण साचें । करूनी ठेविती कांट्यांचें । रक्षण तिचें करावया ॥ ५७ ॥ तोच आहे न्याय येथें । स्त्रीदेहरूप शेळीतें । तीव्र व्रत कुंपणातें । बांधून रक्षण करावें ॥ ५८ ॥ पती सकाम पाहूनि । तत्पर रहावें स्त्रियांनीं । लहान मुलांच्या संगोपनीं । दक्ष फार असावें ॥ ५९ ॥ मुले आपुली सन्मार्गरत होतील

ऐसें शिक्षण सत्य । देणें आपुल्या मुलांप्रत । नानागोष्टी सांगोनी ॥ ६० ॥ सासू श्वशुर दीर जावा । यांचा द्वेश न करावा । सवत आपल्या प्रेमभावा । तिच्याविषयीं धरणें मनीं ॥ ६१ ॥ चौरचौघांनीं गुण घ्यावे । ऐसें वर्तन असावें । पत्याज्ञेनें आचरावें । व्रत एखादें आल्या मनीं ॥ ६२ ॥ पूर्व पापें करून । भर्ता झालिया गतप्राण । कडकडीत ब्रह्मचर्य धरून । आयुष्य आपुलें कंठावें ॥६३॥ वैधव्य नशिबीं आल्यावरी । न पहुडिजे मृदु शय्येवरी । सौगंधित उटया शरीरीं । कदा आपुल्या करूं नये ॥ ६४ ॥ नक्त हविष्यान्न शाकाव्रत । एकादश्यादि उपवास सत्य । आचरोनी जगन्नाथ । हृदयसंपुटी सांठवावा ॥६५॥ जेणें होय कामोद्दीपन । ऐसें न कदा सेवणें अन्न । सदा अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें विधवांनीं ॥६६॥ आत्मानात्म विचार करणें । संन्यस्तापरि राहणें । देवतार्चन भक्तीनें । करून पुराणें वाचावीं ॥ ६७ ॥ ही साधारण पुरुषस्त्रीनीति । कथन केली तुजप्रती । ऐसें वागतां बद्धस्थिति । अनायासें होय दूर ॥ ६८ ॥ आतां बद्धस्थितीचीं लक्षणें सांगतों मी तुजकारणें । तिकडे आपुलें अवधान देणें । करूनी मन एकाग्र ॥६९॥ धर्माधर्म जाणेना । ईश्वर कोण हें ओळखेना । मनीं न उपजे सव्दासना । त्याशीं बद्ध म्हणावें ॥७०॥ जो केवळ कपटपटू । ज्याचें वचन सदा कटू । ज्याचीं पापें अचाटू । तोही बद्ध जाणावा ॥ ७१ ॥ साधुसंत सज्जन । यांतें नोळखी ज्याचें मन । प्रपंचीं जो तल्लीन । तोहि बद्ध जाणावा ॥७२॥ दानधर्मीं न ज्याची मती । पोकळ वितंडवादी अती । तोही बद्ध निश्चिती । शिष्योत्तमा जाणावा ॥ ७३ ॥ परांच्या ठेवी बुडवीत असे । आपला सवरात करीत असे । साधुसंता निंदीतसे । तोही बद्ध जाणावा ॥ ७४ ॥

आपुली वाढविण्या थोरी । उगीच दुसऱ्यांची निंदा करी । सोंग साधूचें घेऊन वरी । करी अनीति तो बद्ध ॥ ७५ ॥ प्रपंच ज्याचा परमार्थ । प्रपंच ज्याचा पुरुषार्थ । सदा प्रपंची ज्याचे चित्त । तोही बद्ध जाणावा ॥ ७६ ॥ जो मित्राचा द्रोह करी । जो गुरुशीं वैर धरी । विश्वास महा वाक्यावरी । ज्याचा नसे तो बद्ध ॥ ७७ ॥ नाना ग्रंथ भाराभर । करूनिया पाठांतर । ज्याचें न होय शुद्ध अंतर । तोही बध्द जाणावा ॥७८॥ बध्दासी न मिळे सग्दती । बध्दासी न घडे सत्संगती । तो जाय यमलोकाप्रति । यातना अमित भोगावया ॥७९॥ आतां मुमुक्षुलक्षण । करितों मी तुज कथन । ती करावीं तुवां श्रवण । सद्भाव ठेवूनियां ॥८०॥ जो बध्दस्थितीस कंटाळला । जाणे सदसद्विचाराला । म्हणे कधीं भेटेल मला । देव तो मुमुक्षु ॥ ८१ ॥ सत्संगाची करी आस । निःसार मानीं जगतास । जो विटला प्रपंचास । तो मुमक्षु जाणावा ॥ ८२ ॥ देहप्रारब्धें जी स्थिती । प्राप्त झाली तयाप्रतीं । त्यांतची मानी चित्तीं । समाधान मुमुक्षु ॥ ८३ ॥ जयाशीं पाप करण्याचें । वाटतसे भय साचें । असत्य न बोले कदा वाचे । तो मुमुक्षु जाणावा ॥ ८४ ॥ कृतकर्माचा पश्चाताप । ज्यास झाला असेल सत्य । तो जरी असला पतीत । तरी मुमुक्षु जाणावा ॥ ८५ ॥ देवाविषयीं ज्यास आस्था । साधूंचे ठायीं नम्रता । जो नीतिचा असे भोक्ता । तो मुमुक्षु जाणावा ॥८६॥ जो क्षणेक सत्संग सोडीना । ज्याची अखंड चालली रसना । श्रीहरीच्या नामीं जाणा । तो साधक म्हणावा ॥८७॥ विष वाटे विषय ज्यासी । जो अध्यात्मविद्येसी । साधावया प्रतिदिवशीं । यत्न करी तो साधक वा ॥८८॥ जो ध्यान करी ईश्वराचे । ग्रहण करून एकांताचें । त्यानें पद साधकाचें । घेतलें ऐसें

ह्मणावें ॥ ८९ ॥ जो हरीचे गुणानुवाद । एकतां मानी आनंद। कंठ होतसे सद्गत । तो साधक ह्मणावा ॥ ९० ॥ लौकिकाची न करितां पर्वा । करी सदा संतसेवा । चित्तांतून रमाधवा । जाऊं न दे तो साधक ॥ ९१ ॥ निंदा स्तुती ज्या समान । तैसाच मानापमान । जन आणि जनार्दन । एक जया सिध्द तो ॥ ९२ ॥ षड्रिपूंचे विकार । ज्यासी न होती तिळभर । संकल्प निमाले साचार। अवघे जयाचे सिद्ध तो ॥९३॥ संकल्प अथवा विकल्पाशी । जाण न मुळींच जयापाशीं । मी तूं या भावनेशी । न जाणें तो सिध्द॥९४॥ देहाची न ज्यांना क्षिति । जे मीच ब्रह्म ऐसे लेखिती । सुख-दुःखाचा अभाव चित्तीं । ज्यांच्या असे ते सिध्द ॥९५॥ ह्या ज्या मी कथिल्या स्थिती चार । ह्याचा करी पूर्ण विचार । हे जें दिसे चराचर । तें स्वरूप ईश्वराचें ॥ ९६ ॥ ईश्वर आहे अवघ्या ठायीं। त्याविण रिता ठाव नाहीं । परि मायेनें ठकविलें पाही । उमगूं न दे त्या ईश्वरा ॥९७॥ मी तूं आणि माधव सत्य । तैसा मारुती पंढरीनाथ । ह्माळसापती काशीनाथ । आडकर साठे हरीपंत ॥९८॥ काका तात्या गणेश बेरे । तैशीच वेणू पहा रे । भालचंद्रादि लोक सारे । आहेत अंश प्रभुचे ॥ ९९ ॥ म्हणून कोणी कोणाचा । द्वेष करूं नये साचा । अवघ्या ठिकाणीं ईश्वराचा । वास हें विसरू नये ॥१००॥ म्हणजे अंगीं निर्वैरता । आपोआप निपजे तत्वतां। निर्वैरतचा उदय होता । साधेल अवघें हळुहळू ॥ १०१ ॥ चित्त जाण मानवाचें । आहे उच्छृंखल साचे । तें स्थीर करण्याचे। प्रयत्न केले पाहिजेत ॥ १०२ ॥ जैसी मक्षिका अवघ्यावर । बैसे परि वैश्वानर । पाहतां फिरे सत्वर । तेथूनिया माघारी ॥ १०३ ॥ तैसेंच हें रंगेल मन । सर्वांठायीं रमे पूर्ण । परि एक ब्रह्म पाहून । तोंड

आपुलें फिरवीतसें ॥ १०४ ॥ ऐसें हें ओढाळ मन । ब्रह्मी न झाल्या संलग्न । जन्ममरण यात्रा जाण । नाहीं चुकणार नाराशणा ॥ १०५ ॥ ती तों चुकविली पाहिजे आधी । येऊनिया नर जन्मामधी । या जन्मापरि संधि । नाहीं दुसरी अमोलिक ॥१०६॥ म्हणूनी मन करण्या स्थिर । हा मूर्तिपूजेचा प्रकार । मूर्तींतही परमेश्वर । नाहीं परी ती करावी ॥ १०७ ॥ मूर्तिपूजा भावें करिता । चित्ताची होय एकाग्रता । एकाग्रतेविण तत्वतां । नये स्थिरत्व मनासी ॥१०८॥ पुढें करावें मनन ध्यान । अध्यात्म ग्रंथावलोकन । तैसे वागण्याचा आपण । प्रयत्न करावा निश्चयें ॥ १०९ ॥ सर्व विद्येंत प्रधान । ही आत्मविद्या जाण । विद्यौकसी पंचवन । वा पर्वतीं मेरु जैसा ॥ ११० ॥ आत्मविद्या साधिल्यावरी । मुक्ति चालून येते घरीं । बंदा गुलाम श्रीहरी । होतो त्याचा अंकित ॥१११॥ ही अध्यात्मविद्येची पायरी । तुम्हां अवघड चढण्या जरी । परि सुलभ युक्ति खरी । सांगतों मोक्षा जावया ॥११२॥ तूं शास्त्री हरीपंत । बेरे काका तात्यादि भक्त । यांहीं अनुसरणें हींच रीत । मोक्षालागी जावया ॥११३॥ मागें तुला आणि निमोणकरा । ज्या कथिलें ज्ञानभंडारा । तैसें वागून परमेश्वरा । शरण जावें अवघ्यांनीं ॥११४॥ नित्य घ्यावें सिध्द दर्शन । नीति जागृत ठेवून । या पुण्येंकरून । अंतसमयीं राहेल शुध्दी ॥ ११५ ॥ मात्र त्या अंतसमयीं । आस कोणाची करूं नाहीं । मन एकाग्र लवलाही । करून प्रभू आठवावा ॥ ११६ ॥ जें आपलें आराध्य दैवत । त्याचें करावें ध्यान सत्य । त्या ध्यानांत घडतां अंत । पावता मुक्ति मिळेल ॥ ११७ ॥ जैसी तुकतीच गेली वन्नू । नागांवात सुलक्षणू । तैसेच अडकर आणि वेणू । मुक्त होतील

आत्मज्ञानें ॥ ११८ ॥ ऐसें बोलून अभयहस्त । ठेविला चांदोरकर-
शिरीं सत्य । धन्य महाराज साईनाथ । नमन माझें तयाशीं॥११९॥
ऐसी नीति चांदोरकरांनीं । ऐकून द्रव जाहिले पाणी । लीन होऊन
साईचरणीं । बोलूं लागले रुद्धाचें ॥ १२० ॥ हे परब्रह्ममूर्ते गुण
गंभीरा । हे महासिध्दा करुणाकरा । मायबापा परम उदारा । भवन
दीचा तारू तूं ॥ १२१ ॥ होऊन आम्हां अज्ञजनांसी । नेलेस
पैलतटासी । सांगूत दिव्य ज्ञानासी । ऐसीच कृपा असों दे ॥१२२॥
तई ह्मणती साईनाथ । तुह्मी अवघे माझे भक्त । मी न विसरें
तुह्मांप्रत । नका करूं काळजी ॥ १२३ ॥ अल्ला इलाही श्रीराम।
देईल तुम्हां सौख्यधाम । पुरवील तुमचें कोड काम । वचन माझें
प्रमाण हें ॥१२४॥ सीतावंदरे आण चित्तीं । हो । बाबांची थोर
महती । चाल त्यांच्या दर्शनाप्रती । वंदन करीं पायांचें ॥ १२५॥
त्यांच्या भक्तांच्या खेटराची । सरीही न ये आपणां साची । परी
बाबा माय अनाथांची । तारण आपुलें करील ॥ १२५ ॥ आज
बाबांचे जमले भक्त । चांदोरकरादि हरीपंत । बाबांनीं आपुल्या
भक्तांप्रत । केली आहे मेजवानी ॥१२७॥ ज्ञानवैराग्य आणि भक्ती।
हींच पक्वानें निश्चिति । करून आपल्या भक्तांप्रती । जेवा ह्मणती
यथेच्छ ॥ १२८ ॥ जें जें रुचेल जयाशीं । तें तें त्याणें सेवावें
ऐसी । ताकीद आपुल्या भक्तांशीं । बाबा करितां चाल सित॥१२९॥
आपण उभयतां कुत्र्यापरी । त्या समर्थांच्या राहूं द्वारीं । एखादा
तो तुकडा तरी । फेकील आपणांकडे मे ॥ १३० ॥ तोच पुरेल
आपणांशीं । कृतार्थ वेडे करण्याशीं । चाल पर्वणी पुन्हां ऐशी । नाहीं
कधीं येणार ॥ १३१ ॥ शताश्वमेधाचें पुण्य । येथेंच मिळेल तुह्मां
लागून । या अध्याया केल्या पठन । एक वेळही श्रोते ॥ १३२॥

ही साईंची अध्यायत्रयी । सरस्वती गंगा यमुना पाही । हेंच प्रयाग सांगू काई । भावार्थांत बुडी घ्या ॥ १३३ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत । वदलों यथामती सत्य । हे तारक भक्तांप्रत । होवो ह्मणे दास गणू ॥ १३४ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

## इति त्रयस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः

३०

# श्री संत कथामृत

श्री दासगणूकृत

## अध्याय ५७ वा

श्री गणेशायनमः ।। हे चित्स्वरूप लंबोदरा । आद्यमूर्ते उदारा । धरून सत्वर माझ्या करा । ग्रंथलेखक करावें ।। १ ।। ऐका श्रोते समस्त । हा संतकथामृत नामें ग्रंथ । साक्षादृतु वसंत संतकथा या आम्रतरू ।।२।। चमत्कार फांद्या सोज्वळ । पद्यरचना पर्णे कोमळ । बोधरूपी आलें फळ । तें सेविण्या कोकिळ व्हा ।।३।। हा ग्रंथ मानस सरोवर । पद्यरचना हेंच नीर । संतकथा कमळे थोर । या कांसारीं विकासलीं ।। ४ ।। बोधरूपी मकरंद । या कमलीं असे शुद्ध । तो सेविण्यासी मिलिंद । व्हा हो तुम्ही अवघे ।। ५ ।। मागें भक्तलीलामृत ग्रंथांत । जे मी वर्णिलें साईनाथ । एकतीस बत्तिस तेहतिसांत । शिर्डी ग्रामीं वास ज्यांचा ।। ६ ।। तो भक्तांचा कल्पतरू । तो भवार्णवीचा होय तारू । महा उदार दयासागरू । भक्तवत्सल ज्ञाननिधी ।। ७ ।। त्या समर्थांचे दर्शनाशीं पातलें तद्भक्त शिर्डीस । धन संक्रमणीं पौषमासीं । उत्तम पर्व लक्षुनिया ।। ८ ।। येथें शंका येईल मनीं । कीं धन सक्रांतमकराहूनी श्रेष्ठ नसतां पर्वणी । कां हे भक्त मिळाले ।। ९ ।। परी पहा धनसंक्रांती । येतां जन सुप्रभातीं । नैवेद्य दावून सूर्याप्रती । प्रभातीं करिती भोजनें ।।१०।। तोच प्रकार येथींचा । असे जाणा श्रोते साचा । उलगडा करून तयाचा । सांगतों तुम्हा कारणें ।।११।। अनुतापरूपी वाजली थंडी । भावरूप घालून बंडी । आले भक्त तांतडी । सद्गुरूसी भेटावया ।।१२।। शिर्डी उदयगिरी थोर । साई महाराज हा दिनकर । तेथें उदेला निर्धार । म्हणून भक्त मिळाले ।। १३ ।।

साईकृपा ही प्रभात। श्रद्धारूप गंगेंत। स्नानें करून अवघे भक्त। गेले साईदर्शना ॥१४॥ तों समर्थांनीं मांडलें पान। भक्तांसीं द्याया भोजन। करूनियां पक्वान्न। उत्तम आत्मज्ञानाचें ॥ १५ ॥ हाचि तेथींचा धनुर्मास। म्हणून या पर्वणीस। भोजनाची करून आस। आले भक्त धावोनिया ॥१६॥ गोविंदात्मज नारायण। धीर उदार सज्जन। चांदोरकुलीं जन्म जाण। झाला जयाचा कल्याणीं ॥१७॥ तो आणि हरिपंत। महाकर्मठ शुचिर्भूत। वेद मार्गी अत्यंत। निष्ठा असें जयांची ॥ १८ ॥ बेरे नाना निमोणकर। लक्ष्मण मारुती इतर। भक्त जमले थोर थोर। किती म्हणून सांगावें ॥ १९ ॥ अवघे बसले मशिदीसी। हर्ष अत्यंत मानसी। जैसें पाहून जननीसीं। आनंदती लेंकुरें ॥ २० ॥ तैं म्हणती चांदोरकर। जोडून आपुले दोन्हीं कर। या सकट त्रिवार। प्रश्न आम्हीं केला तुम्हां ॥२१॥ त्याचें न दिधलें उत्तर। कां राग आमुचेवर। आज सांगा परमेश्वर। कोण कैसा कोठें असे ॥२२॥ महाराज म्हणती त्यावरी। नाना राग न माझ्या अंतरीं। तुम्ही माझीं मुलें सारीं। मी कोपूं कोणावर ॥ २३ ॥ मीं स्थान तुम्हां रूसण्यातें। श्री व्यंकुशहा जरी असते। तरी मशी स्थान होतें। तुम्हासारिखें रुसावया ॥ २४ ॥ असो मागें तुम्हांलागुन। म्यां जे अध्याय कथिले दोन। त्याचें आधीं करून स्मरण। अवधान द्यावें मद्बोला ॥ २५ ॥ नाना त्या द्वय अध्यायीं। जें मी ज्ञान कथिलें पाहीं। तें सेविल्या अंगीं येई। साधन चतुष्टयसंपन्नता ॥ २६ ॥ साधन चतुष्टयसंपन्न। जेव्हां होतो शिष्य जाण। तेव्हांच कथावें ब्रह्मज्ञान। उद्धार त्याचा व्हावया ॥२७॥ सिद्धवस्तु साधावया। ज्या ज्या योजिती उपाया। त्याचें नांव ये ठायां। साधन ऐसें जाणिजे ॥ २८ ॥ तीं साधनें आहेत

चार। नामें ऐक क्रमवार। चित्त करूनियां स्थिर। आहे विषय गहन हा ॥ २९ ॥ नित्यानित्य वस्तु विवेक। दुसरें तें वैराग्यदेख। तिसरें शमदमादि शटक। चौथें जाण मुमुक्षुता ॥ ३० ॥ नित्यानित्यवस्तु विवेकाची। व्याख्या ऐक आतां साची। पाहिजे भावना मनींची। कीं ब्रह्मसत्य जगमिथ्या ॥३१॥ नित्यानित्य वस्तु विवेक। बाणले मनीं हें दावण्या देख। नाना खटपटी दांभिक। करूनि जना भोंदिती ॥ ३२ ॥ कोणी होऊन वारकरी। खेपा घालिती पंढरपुरीं। परी एकही न जाणे हरि। कोण कैसा कोठे असे ॥३३॥ तीही न वारी श्रद्धायुक्त। केवळ मान मिळावा जगतांत। हाच हेतु असे सत्य। त्या वारीच्या मुळाशीं ॥३४॥ नानाग्रंथ भाराभर। करूनियां पाठांतर। परी स्वतांचे न शुद्ध अंतर। उपदेश मात्र करिती परा ॥ ३५ ॥ ते ज्ञानरूपी सरोवरांत। दर्दुर जाण निश्चित। वादरूपी चिखलाप्रत। सेवून टाकिती मकरंदा ॥ ३६ ॥ परनिंदा ज्याचे मुखीं। आपलीच मिरवीती शेखी। ते न जाणावे विवेकी। अयोग्य ब्रह्म ज्ञानातें ॥ ३७ ॥ इहपरलोकींच्याविषयाची। आशा न ज्यास उरली साची। तीच मूर्ति वैराग्याची। नाना जाण निश्चयें ॥ ४८ ॥ शम दम तितिक्षा उपरती। श्रद्धा समाधान यां प्रती। शमादी षटक बोलती। ज्ञाते पुरुष चांदोरकरा ॥३९॥ मनोनिग्रह विषयां ठायीं। याचें नांव शम पाही। ऐक दमाची व्याख्याही। सावधान चित्तानें ॥४०॥ विषयीं गेलिया वासना। बलात्कारे आवरिती मना। त्या आवरण्याप्रती नाना। दम ऐसे म्हणावें ॥ ४१ ॥ निज प्रारब्धें करून। प्राप्त झालिया दुःख जाण। तें आक्रोशा वांचून। सहन करणें ती तितिक्षा ॥ ४२ मायाजाळीं न गुंते चित्त। कनक कांता सुत आप्त। हें मानणें मिथ्या भूत। याचें नांव उपरती ॥ ४३ ॥ विश्वा

शुक्त असणें मन । याचेंच नांव श्रद्धा जाण । आतां राहिलें समाधान । त्याचें विवरण ऐकावें ॥ ४४ ॥ समान सुख दुःखें मानी सारीं । तळमळ मुळीं न अंतरीं । स्थिर चित्त शैलापरी । याचें नांव समाधान ॥ ४५ ॥ मनीं मोक्ष इच्छा बळकट । त्या व्यतिरिक्त मानी वीट । अपरोक्ष ज्ञानाची जो वाट । हुडकीतसे तो मुमुक्षु ॥ ४६ ॥ मुमुक्षुपणाची पात्रता । अंगीं असणें तत्वतां । याचें नांव मुमुक्षुता । निश्चयें करून जाणावें ॥ ४७ ॥ आतां मोक्ष म्हणजे न वैकुंठ । मोक्ष म्हणजे न कैलासपेठ । आहे फार अवघड वाट । चांदोरकरा या मोक्षाची ॥ ४८ ॥ जगाचें जें आदिकारण । जें अविनाश शुध्द चैतन्य । त्या वस्तूशीं तादात्म्य होणें । याचें नांव पहा ॥ ४९ ॥ त्या अविनाश मोक्ष पदासी । जाणें हाचि पुरुषासी । पुरुषार्थ नाना निश्चयेसीं । त्यावीण अवघें वोखटें ॥५०॥ ऐसी ऐकितां समर्थवाणी । चांदोरकर जोडोनि पाणी । बोलते झाले लीन वचनी । ते शुध्द चैतन्य कैसें असे ॥ ५१ ॥ जें जगाचें जगदाधार । जें व्यापून उरलें चराचर । ज्याचेंच ठायीं अखेर । लय होणार जगताचा ॥ ५२ ॥ ऐसें जें का आद्यमूळ । तेंच चैतन्य सोज्वळ । जगत जें दिसतें निवळ । तो भास जाण नारायणा ॥५३॥ तें चैतन्य आहे ऐसें । हा निश्चय ना करवत असे । मात्र क्षण क्षणा येत असे । साक्ष असणेपणाची ॥५४॥ जेथें न व्यापक चैतन्य । ऐसें न मुळी जगीं स्थान । एकही वस्तु त्यावीण । गवसे न शोधूं गेलिया ॥ ५५ ॥ वस्तु निर्देश होण्यासी । चैतन्य मात्र म्हणावें त्यासी । बाकी वस्तु त्यासी । नाम रूप कांहीं नसे ॥५६॥ जैसा कां हा प्रभंजन । रंग रूपातीत जाण । तैसेंच आहे चैतन्य । हें कदाहीं विसरू नको ॥५७॥ त्या चैतन्या ब्रह्म म्हणती । तदोपासना ज्ञाते करिती ।

१४४

ऐशा उपासका या जगती । ब्रह्मवेत्ते म्हणतात ॥ ५८ ॥ वृक्ष कोटी प्राणी कोटी । जीव कोटी जंतु कोटी । एक चैतन्याच्या पोटीं अवघे जाण सामावे ॥ ५९ ॥ दृश्य ज्ञेय भासमान । या अवघ्यासी आद्यकारण । नाना एक चैतन्य । किती सांगू तुजप्रति ॥६०॥ तें चैतन्य सर्व व्यापक चैतन्य । क्लेश रहित देख । तें सत्यज्ञानरूप एक । आनंदरूप तेंच कीं ॥ ६१ ॥ हे अवघे आवग । त्यापासून नाहींत भिन्न । त्या चैतन्या लागून । ब्रम्ह ऐसें म्हणावें ॥ ६२ ॥ तै चांदोरकर जोडून हात । म्हणती हे सद्‌गुरुनाथ । ब्रह्म सर्वव्यापक क्लेश रहित । आनंदरूप एक म्हणतां ॥ ६३ ॥ आणि तेंच ब्रह्म सर्वाठायीं । नटलें म्हणतां माझें आई । येथ मजला शंका येई । त्याचें करा निरसन ॥६४॥ जग अवघे क्लेश युक्त । तैसेंच आहे अनंत । चैतन्याचे गुण त्यांत । कांहीं न येती प्रत्यया ॥ ६५॥ जो अंध जन्मापासून । तो कैसा पाहिल लावण्य । तसें सत्य चैतन्य । मिथ्यामाजीं राहे कसें ॥६६॥ आत्माच चैतन्य लेखितां । तदैकत्व गुरुनाथा । नष्ट होईल सर्वथा । कां कीं आत्मे अनेक ॥ ६७ ॥ आत्म्याचें सुखदुःखभान । न होय अन्योन्या लागून । मग अवघ्यांत एक चैतन्य । आहे कैसें म्हणावें ॥६८॥ जैसीं शरीरें भिन्न भिन्न । तैसेच आत्मे भिन्न भिन्न । आत्मा चैतन्यापासून । वाटे असावा निराळा ॥ ६९ ॥ तैं म्हणती साईनाथ । चुकलोस तूं नाना येथ । आतां करून स्वस्थ चित्त । अवधान द्यावें मद्बोला ॥ ७० ॥ पहा ताम्र शुभ्र काळा । मिश्र रंग निळा पिंवळा । किरमिजी हिरवा जांभुळा । पृथक टाकिलें पाण्यांत ॥ ७१ ॥ मग त्यांचे भरून पेले । ठेविले वेग वेगळाले । म्हणून कां होतें निराळें । उदक वेळ्या ते ठायीं ॥ ७२ ॥ ताम्रसंगें ताम्र जाण । भासलें ताम्र होन । पिव-

ध्यासंगें पीलपण । आलें नाना उदकासी ॥ ७३ ॥ मग तें घेऊन मिश्रण । केलिया त्याचें पृथक्करण । पिवळेंपण हिरवें पण । नष्ट होईल उदकाचें ॥ ७४ ॥ तैसें आत्माहृदय होतां एक । प्रतीतीस येती सुखदुःख । हृदयें मात्र अनेक । आहेत नाना मानवांचीं ॥ ७५ ॥ परी आत्म्याचा न भेद तेथ । तो अवघ्यांचा एकची एक सत्य । सुखदुःखेंही तो खचित । आहे धर्म हृदयाचा ॥ ७६ ॥ परी हृदयास येण्या हृदयपण । आहे आत्म्याची अपेक्षा जाण । आत्मा तोच चैतन्य । बोळख वत्सा तयासी ॥७७॥ आतां नाना तुमची । करावया समज साची । फोड करून या विषयाची । सांगतों तें ऐकावें ॥ ७८ ॥ चैतन्य आहे त्रिगुणात्मक । परमार्थिक व्यवहारिक । आणिक पहा प्रतिभासिक । हे वत्सा नारायण ॥ ७९ ॥ जैसा एकचि देहजाण । भोगितो अवस्था तीन । वृद्ध तारुण्य बाळपण । तोची प्रकार येथींचा ॥ ८० ॥ पारमार्थिक चैतन्याची । ज्या आत्म्या आली साची । योग्यता नाना तयाची । होत गणना साधूंत ॥ ८१ ॥ जे सशास्त्र करिती वर्तन । त्याज्या त्याज्या जाणून । त्या आत्म्यालागून । व्यवहारिक म्हणावें ॥ ८२ ॥ जे असत्या सत्य मानिती । जे अज्ञानपटलें झांकले असती । नाना ऐशा आत्म्याप्रती । प्रतिभासिक म्हणावें ॥ ८३ ॥प्रतिभासिक तें अज्ञान । व्यावहारिक ते सज्जन । पारमार्थिक ते संत जाण । परि आत्माचि कारण अवघ्यांसी ॥ ८४ ॥ पहा राजा, अधिकारी, राजदूत । या अवघ्यातिघांप्रत । कारण राजसत्ता सत्य । परि भिन्नत्व तिघांठायीं ॥८५॥ राजास बसावया सिंहासन । गज पालखी नाना यान । राजा स्वइच्छें करून । अवघ्यालागीं वागवितो ॥ ८६ ॥ राजाज्ञेस अनुसरून । अधिकारी वर्ग वर्ते जाण । त्यांच्या इच्छेस अवलंबून ।

राहावें लागतें राजावरी ॥ ८७ ॥ बजावणी राजाज्ञेची । राजदूत करिती साची । परि त्यांच्या इच्छेची । गती येथें कुंठित ॥८८॥ राजसत्तेच्या आवरणांत । ही वागते अवघी रयत । परी कारण अवध्यांप्रत । आहे एक राजसत्ता ॥ ८९ ॥ राजेपण सर्वाधिपण । दूतपण रयतपण । हें अवघें अवलंबून । आहे राजसत्तेवरी ॥ ९० ॥ राजा अधिकारी राजदूत । तैसीच ही अवघी रयत । या सर्वांपासून खचित । आहे भिन्नराजसत्ता ॥ ९१ ॥ एक राजा मृत होतां । नष्ट न होय राजसत्ता । म्हणून तिची भिन्न कथा । उघड उघड दिसते की ॥ ९२ ॥ परी तादात्म्य राजसत्तेसी । जो होतो निश्चयेसीं । राजेपण तयासी । लाधते हा न्याय असे ॥ ९३ ॥ स्वतः ती राजसत्ता । अविक्रीय आहे सर्वथा । मात्र तिचा आधार पोहचतां । सर्व कांही घडतसे ॥ ९४ ॥ तूं जो बैसतोस गादीवर । तो राजसत्तेच्या जोरावर । जो पंखा वारी तुजवर । तव शिपाई नारायणा ॥९५॥ तोही राजसत्तेनीं । पंखा वारी तुजवरी जाणी । तुम्हां उभयतां लागूनी । कारण सत्ता एकची ॥९६॥ पूर्ण राजसत्तेचा । अनुभव राजा घेतो साचा । तिच्या कांहीं अंशाचा । अनुभव घेत अधिकारी ॥९७॥ त्याही पेक्षां कमी अंश । लाधलासे शिपायास । नुस्त्या तिच्या आश्रयास । राहून रयत वर्ततसे ॥ ९८ ॥ तैसे आत्मे पारमार्थिक । ब्रह्मासी तादात्म्य होती देख । म्हणून त्यांना ब्रह्मसुख । पूर्ण लाभे नारायणा ॥९९॥ ऐसें ऐकतां गुरूभाषण । तो गोविंदात्मज नारायण । बोलता झाला कर जोडून । त्या साई समर्थासी ॥ १०० ॥ निरवयव राजसत्तेचे । अंश कैसे पडतील साचे । अंश पडतां तियेचे । निरवयत्व जाईल ॥१०१॥ महाराज म्हणती तेधवां । नाना प्रश्न केलास बरवा । तेणें समाधान माझे जिवा । झालें असे ये काळीं ॥ १०२॥

राजसत्ता अभेद खचित । परी विभागाची येते प्रचीत । तोच न्याय चैतन्यांत । अनंतरूप दिसे जें ॥१०३॥ त्या सत्तेचे न अंश पडती । परी ग्राहक भाग पाडून घेती । जैसी ज्याची असे शक्ती । तो तितुके घेत असे ॥१०४॥ घट बोळकें रांजण । डेरा गेळा माथणी जाण । या अवघ्यांत भरून । आकाश राहिलें नारायण ॥१०५॥ आकाश जेव्हढें नदींत । त्यांपेक्षा थोडें किंचित । सामावलें रांजणांत । त्यापेक्षां घटांत कमी ॥१०६॥ गेळ्या बोळक्यामाजी जाण । कमी असे त्याहून । आकाशाचे कां ह्मणून । भाग येथें पडले बा ॥१०७॥ तीच आहे तेथें स्थिती । हें नाना आण चित्तीं । हें आत्म्याचें रूप निश्चिती । तुजलागीं निवेदीलें ॥१०८॥ हें जें अवघें दिसतसे जगत । तो मायेचा खेळ सत्य । मायाब्रह्म एकचित्त । होऊन ब्रह्मांड रचियेलें ॥ १०९ ॥ तैं म्हणे तो नारायण । समर्था ही माया कोण । कधीं कोणीं निर्माण । केलें ईस ती आहे कसी ॥११०॥ जगाचें आद्य कारण । आपण कथिलें चैतन्य । जग त्याहून नसे भिन्न । मग ही माया आली कशी ॥ १११ ॥ महाराज बोलले त्यावरी । माया उदेली कैशापरी । तें मी सांगतों निर्धारीं । ऐक आतां एकचित्तें ॥ ११२ ॥ त्या चैतन्याची जी शक्ति । तीच माया निश्चिती । तिनें या चैतन्याप्रती । ठायीं ठायीं नटविलें ॥११३॥ परी निवड करूं जातां । वेगळी न होती सर्वथा । गूळ गोडी निवडितां । जैसी नाना नये कीं ॥११४॥ वा सूर्य आणि प्रभा त्याची । पृथक करितां नये साची । तीच ब्रह्म आणि मायेची । आहे स्थिती चांदोरकरा ॥ ११५ ॥ सूर्य आणि प्रभा जाण । शब्द जरी भिन्न दोन । परी प्रभा सुर्य मिळोन । सूर्य आला आकारा ॥११६॥ सूर्य आपल्या प्रभेकरून । आपलेंच जगा करवितो ज्ञान । माया ब्रह्मांत तो जाण । प्रकार आहे नारायणा

॥ ११७॥ परी माया आहे सांत । चैतन्य तें अंतातीत । परी दोहोंचें अनादित्व । कायम आहे सर्वथा ॥११८॥ माया ती प्रकृति । चैतन्य पुरुष निश्चितीं । या दोहोंपासून उत्पती । झाली जगाची या वस्ता ॥ ११९ ॥ प्रकृति पुरुषाचें विवरण । गेला ज्ञानराजा करून । अमृतानुभवा माजी जाण । मोहिनी राज प्रसादें ॥ १२० ॥ म्हणून आतां तयाची । पुनरुक्ति न मी करीं साची । फक्त त्या आत्मज्ञान गुहेची । ओळख देतो करून ॥ १२१ ॥ जे जे त्या गुहेंत । गेले ते न येती परत । ते गुहाच होउनियां तेथ । आनंदानें राहती ॥ १२२ ॥ पुरुष अवघ्याचा कारण । माया हें कार्य जाण । त्या मायेचें महिमान । अगाध आहे नारायणा ॥ १२३ ॥ मी गोमा तिम्या अमका कोणी । भास हें जें वाटतें नाना मनीं । तें मायेच्या योगानीं । असत्या होतसे ॥ १२४ ॥ मायेनें वेधिल्या पूर्ण । सत्याचें न राहे भान । माये माजीं दोन गुण । आहेत ते ऐके आतां ॥ १२५ ॥ जें आहे त्यां झांकणें , जें नाहीं तें भासवणें । त्या मायेच्या योगानें । भ्रमित होतो जीव हा ॥ १२६ ॥ एका मजुरास पडलें स्वप्न कीं मी राजा झालों म्हणून । येथें प्रथमतः मजूरपण । त्याचें झांकिलें मायेनें ॥ २७ ॥ वास्तविक नसतां राजे पण । तें त्या मायेनें भासविले जाण । तैसे ब्रह्मास झांकून । जगा माया दावितसे ॥१२८॥ वस्तुता हें नोहे जगत । एक चैतन्य वस्तु सत । परी मायेमुळे आले प्रतीत । जगत आहे म्हणूनी ॥ १२९ ॥ जगतासह जगताचें । विषय अवघे असत्य साचे । परी ते सत्य वाटून जगताचे । अकल्याण करिताती ॥१३०॥ यासाठींच आवरण । टाक मायेचे ज्ञानें करून । मग दिसेल शुद्ध चैतन्य । तूंच अवघा सर्वांठायीं ॥ १३१ ॥ पाण्याचे गेल्या गढूळपण । जैसे दिसतें शुद्ध जीवन ।

तैसें मायेचें गढूळपण । टाकितां चैतन्य दिसेल कीं ॥ १३२ ॥ त्या सद्‌वस्तूची उपासना । तुवां करावी नारायणा। हेंच माझें अवघ्यांना। आहे आतां सांगणें ॥१३३॥ आत्मा तीच सद्वस्तु । हा अध्यात्माचा होय हेतु । तो आत्मा जाणून तूं । ह्याच जन्मीं मुक्त व्हावें ॥१३४॥ ऐसें ऐकतां ब्रह्मज्ञान । अवघे आनंदले पूर्ण । समर्थपदीं लोटांगण । घालूं लागले शिष्य ते ॥१३५॥ वैद्य साठे चांदोरकर । बेरे नाना निमोणकर । मारुती लक्ष्मण नूलकर । किती म्हणोन वर्णावे ॥ १३६ ॥ अनुलक्षुनी या अवघ्यांसी । महाराज बोलले प्रेमेंसी । वत्सांनों या ज्ञानासीं । ठेवा मनीं जागृत ॥१३७॥ तथास्तु म्हणती अवघे भक्त।. वारंवार घालिती दंडवत । ज्ञाननभींचा सविता जेथ । तेथें अंधार काठोनी ॥ १३८ ॥ हे साई महाराज कृपाराशी । पदरी घ्या या लेंकरासी । आपुल्या कृपाछायेसी । बैसवा हा दासगणू ॥ १३९ ॥ स्वस्तिश्री संत कथामृत । साईमहाराज मेघ येथ । वर्षला हे ज्ञानामृत । त्यासी सेवा म्हणे गणू ॥१४०॥ इति सप्तपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः

श्री दासगणूकृत श्री संत कथामृत

यातील श्री साईबाबाविषयींचा ५७ वा अध्याय.

८६३

# शिर्डीवृत्त

## जानेवारी १९४१

या महिन्यांत श्रींचे दर्शनास मद्रदेशीय तसेंच महाराष्ट्रीय भक्तगण आले होते. एकंदर आलेले भक्तांची गांववार यादी पुढीलप्रमाणें आहे. चित्रागुंटा, मद्रास, बेल्लारी, नेल्लोर, कानेगांव, त्र्यंबकेश्वर, बोर्लिज, बेळगांव, विलेपार्ले व अंधेरी.

## देणग्या

आलेले भक्तांकडून कोठी, कायम फंड वगैरे संस्थानचे फंडास आलेल्या आर्थिक देणग्या पावत्याबरहुकूम जमा आहेत. त्यांशिवाय कपडा, [ कापड निळे काठास फित लावलेली ) गुलाबी शाल ( जरीकाठी ) अशा कांहीं वस्तूही देणगीरूपानें आल्या आहेत.

## धर्मकृत्यें

या महिन्यांत एकंदर ८८ अभिषेक, ६ अर्चनें व एक लघुरुद्र झाले. शिवाय गरीबास, फकिरांस अन्नदान, आणि श्री. ए. आर. आर. एम्. रामनाथ चेट्टीयर बंगलोर यांनीं ५० पानास अन्नदान दिले व ता. ३०।१।४१ रोजीं सेक्रेटरी यांचे सांगणेवरून सवा पायलीची खिचडी गरीबास वाटणेंत आली.

## नवलविशेष.

श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी मद्रास हे ता. ७।१।४१ रोजीं शिर्डीहून मद्रासकडे गेले.

ता. १४।१।४१ रोजी मकरसंक्रांतीला श्रीस अभ्यंग पंचामृत स्नान अभिषेक वगैरे कार्यक्रम झाला.

श्री. शामराव हरि सुकटणकर मुंबई यांचे श्रीमंदिरांत एक दिवस रात्रीं ८ ते ९ पर्यंत हार्मोनियमवादन अतिशय उत्तम शास्त्रोक्त वाजवून गायन झाले,

श्री. ह. भ. प. यशवंत नीलकंठ कवीश्वर बुवा श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार यांनीं श्रीमंदिरात ता.१७।१।१९४१ रोजी दोन तास कीर्तन केलें. बुवा स्वतः गाणारे चांगले आहेत. शिवाय विद्वान आहेत. बुवांचें कीर्तनास पेटीची साथ मुंबईचे श्री. शामराव हरि सुकटणकर यानी केली. कीर्तनास शिर्डीची इतर बाहेरगांवची बरीच मंडळी आली होती. बुवाना श्रीबाबांची सर्व स्थानें व संस्थानाची व्यवस्था पाहून परमानंद झाला.

श्री. इनामदार नाशिक बाबांचे एक जुने भक्त यांचे श्रीमंदिरात एक दिवस रात्रीं ८ ते ९ पर्यंत श्रीएकनाथी भागवत ग्रंथांचे प्रवचन झाले.

श्री. ह. भ. प. नारायण बुवा नेवरगांवकर यांचे पौष वद्य ११ रोजीं श्रीमंदिरांत ( वारकरी संप्रदाय पद्धतीनें ) कीर्तन झाले.

या महिन्यांत संस्थान गवईबुवा यांचे एक कीर्तन पौष शु. ११ स श्रीमंदिरात झाले.

श्री. श्रीनिवासन् मद्रास यांनीं श्रीचें संनिध मुलाचें पहिल्या महिन्याचे पहिले श्राद्ध मुलास सद्गती प्राप्त व्हावी म्हणून केलें.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे. श्री. ना. खारकर.

ऑ. चि.

---

## फेब्रुवारी १९४१

या महिन्यांत श्रीचे दर्शनास खालील निरनिराळ्या ठिकाणचे भक्तगण आले होते, त्यांची गांववार यादी पुढील प्रमाणें आहे. नाशिक, संत स्टेट, हैद्राबाद, फलटण, वांद्रे, पुणें, मुंबई, भिवंडी, वाकोला, सांताक्रूझ व पुणें.

### देणग्या

आलेल्या भक्तगणांकडून आलेल्या देणग्या पावत्या बरहुकूम जमा आहेत. त्या शिवाय पुस्तकें पन्नास [ कानडी ] पूजा किं. प्रत्येकीं १ आणा, खादीच्या दोन शाली

अशा कांही वस्तुही देणगी रूपानें आल्या आहेत.

## धर्मकृत्यें

या महिन्यांत एकंदर १०१ अभिषेक, १ लघुरुद्र व ८ अर्चनें भक्तांचे सांगणे-वरून करणेंत आलीं.

**श्रीमहाशिवरात्र** निमित्त श्रीस मंगलस्नान अभिषेक व गावातून रात्री पालखीची मिरवणूक झाली.

## ( विशेष कार्यक्रम )

श्री. राधाबाई उर्फ माईबाई दाणी नाशिक. यानी एक दिवस श्रीमंदिरात दुपारी ४ ते ६ पर्यंत कीर्तन केले.

श्री. शामराव हरि सुकटणकर मुंबई यानी श्रीपुढें गुरुवारी रात्रौ ८ ते ९ पर्यंत एकतास हार्मोनियमवादन व गायन अशी हजेरी दिली.

श्री. टी. आर. प्रधान वकील भिवंडी यानी श्रीज्ञानेश्वरीवर एकतास प्रवचन केलें. याप्रमाणें दोन दिवस श्रीज्ञानेश्वरीवर पुराण झाले.

श्री. शंकरराव दत्ताराम बलवाली वाकोला सांताक्रुझ ( मुंबई ) यानी सात दिवस श्रीगुरुचरित्रग्रंथाचें पारयण सप्ताह श्री. द्वारकामाईत श्रीपुढें बसून कडकडीत उपोषण करून केला.

सं. गवई याची ४ कीर्तनें झाली. माघशु. ११ व माघ व ११ महाशिवरात्र. श्री. दासनवमी अशा दिवशी झाली.

श्री. श्री. ना. ऊर्फ नानासाहेब खारकर ऑ. चिटणीस ( श्री. सा. सं. शि. ) यानी सुमारें चार वर्षांपूर्वी हिराव्या चाप्याची दोमरोपे श्रीचे लेंडीबागेत ठाण्याहून आणून मुद्दाम लावली होती; त्याला महाशिवरात्रीचे दिवशी सुंदर मोठे फुल अतिशय सुवासिक आले तें प्रथम श्रीचे समाधीवर अर्पण करण्यात आले.

श्रीचे लेंडीबागेतील नारळीस प्रथमच आलेले फळ काढून महाशिवरात्रीचे दिवशी त्याची पूजा करुन ते फोडून त्याचा प्रसाद वाटणेत आला.

शिर्डी येथिल हवा पाणी उत्तम आहे.

आपला नम्र

विठ्ठल य. मराठे

---*---

## महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेले कीर्तनकार श्री. वे. शा. सं. कवीबुवा यानी शिर्डीस आलें वेळीं दिलेला शेरा.

श्रीकृष्ण ता. १७-१-१९४१

आज रोजीं शिर्डी येथें म्हणजे पवित्र साईबाबा महाराजाचें क्षेत्रांत येऊन येथें पावित्र्य व आनंद प्रत्यक्ष अनुभविला. श्रीमहाराजांची कीर्तनरूपसेवा त्यांच्या कृपेनें मोठ्या आनंदानें येथें झाली. येथील परिचारक भक्त मंडळी फारच प्रेमळ आहेत. महाराजांचे कृपेनें सर्वांचे कल्याण होवो. हेंच त्यांचें चरणीं मागून माझा अल्पसात्वानंदानुभव लेख पूर्ण करीत आहे.

यशवंत नीलकंठ कवीश्वर
हरिदासानुदास

## शिरडी येथील शेरे बुकातील उतारा:

ॐ श्रीसाईनाथाय नमः

काल रोजीं मी सायंकाळीं येथें आलो. बेळगांवाहून शनिवार रात्रौ निघाल्यापासून वाटेंत श्रीसाईबाबांच्या कृपेनें कोणताहि त्रास न होतां सुरक्षितपणें श्रीसाईंच्या पायांचे सन्निधानीं पोचलों. श्रीसाईनाथांचें मंदिर श्रीद्वारकामाई चावडी, श्री लेंडीबाग वगैरे श्रेष्ठ स्थनांचे दर्शन घेऊन पुनीत झालो व मनाला अत्यंत समाधान वाटले. येथील संस्थान मंडळींनीं माझी सर्व कांहीं उत्तम व्यवस्था ठेविली आणि कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. श्रीसाईनाथाची कृपा असल्यावर काय कमी पडणार, व कोणती उणीव भासणार!

असो ! श्रीसाईनाथ सर्वांचें कल्याण करो !

सही नागेश वासुदेव गुणाजी
वासुदेवाश्रम २७७ ठळकवाडी
बेळगांव

ता. २७।१।४१

# अनुभव

## श्री साईबाबांचें दर्शन

विना आलिया संतांच्या मना । कोण जाईल तयांचें दर्शना ॥

श्रीसांईसच्चरित. ३०–३८

नसतां अल्लामियाचा ऋणी । चढेल काय या मशीदीं कुणी ॥

श्रीसांईसच्चरित. ११–९२

' श्री सांईलीला ' मासिकाच्या, वर्ष १५, अंक ७–८–९ यांत पान ४१ वर माझा अनुभव (ता. ३ मार्च १९३९ चा) प्रसिद्ध केलेला आहे त्यांत नमूद केल्याप्रमाणें श्रीसांईसच्चरित्र आम्ही दर गुरुवारीं वाचीत असतों आणि आरति करीत असतों. आणि त्यायोगे श्रीसाईबाबा आमचें ' भवभय ' निवारून प्रभुपदापाशीं आम्हांस निकट आणीत आहेत असें आम्हाला वाटतें.

आम्हीं श्रीसाईबाबापाशीं एक नवस केला आहे आणि तो नवस पूर्ण झाल्यावर आम्ही सहकुटुंब शिरडीस जावें आणि तेथें श्रींच्या पादुकासन्निध श्रीसाईसच्चरिताचा सप्ताह करावा असें योजिलें आहे. हा आमचा नवस पूर्ण होण्याच्या तयारीस आला आहे पण अद्याप तो पूर्ण झाला नाहीं. यामुळें आम्हीं अद्याप शिरडीस गेलों नव्हतों. गेल्या महिन्यांत नासिकच्या श्रीगजानन महाराज गुप्ते यांचे कांहीं कामासाठीं नासिकास जाण्याचा योगायोग जुळून आला, ही संतांची सेवा म्हणून मी तेथें ( नासिकास ) जाण्याचें ठरविलें. तेव्हां मनांत असा एक विचार आला कीं नासिकास जातांना वाटेंत शिरडीस जाऊन श्रीसांईबाबाचें दर्शन कां घेऊं नये ? आणि श्रींचें दर्शन घेतल्यास

आमचा नवस लवकर पूर्णतेसहि जाईल.' ही प्रेरणा श्रीसाईबाबाकडून झाली असावी असें वाटतें. पुढें मी श्रीयुत श्रीधर नारायण खारकर सन्मान्य सेक्रेटरी श्रीसाईबाबा शिरडी संस्थान कमेटी, मु. ठाणें यांना पत्र लिहून माझा बेत कळविला त्यांनी उत्तरी कळविलें कीं, श्रीसाईबाबाची इच्छा असेल तरच आपले शिरडीस जाणे होईल, आणि सर्व कांही व्यवस्था होईल. एरवीं नाहीं." यानंतर मी शिरडीस जाणेचे नक्की केलें. ता. २२ जानेवारी बुधवार रोजीं निघून दुसरे दिवशी गुरुवारीं शिरडीस जावे असा बेत केला. पण हा सिद्धीस गेला नाहीं. त्याचे आधींच एक दोन दिवस मला एकदम आमांशाचा विकार जडला. तेव्हां बुधवारीं निघणें अशक्यच झाले. चमत्कार असा कीं, गुरुवारीं आम्हीं नेहमींच्या क्रमाप्रमाणें श्रीसाईसत्चरित्र वाचूं लागलों तों अध्याय १३ मधलि श्रीयुत बापुसाहेब बुट्टी व काकासाहेब महाजनी यांना जडलेला जुलाबाचा विकार आणि श्री बाबांच्या कृपेनें बरा झालेला मजकूर वाचणेंत आला, आणि त्यायोगें मनाला एक प्रकारचा आनंद झाला. श्री बाबांच्या उदीनें व प्रसादानें माझा विकारहि बरा झाला आणि पुढें २।३ दिवसांनीं मी शिरडीस जाणेचें ठरविलें. त्याचे आधीं कांहीं दिवस पुण्याचे श्रीयुत य. ना. आठवले कंट्राक्टर आमचे घरीं आले आणि मला भेटून पुण्यास गेले आणि माझ्या विनंतीप्रमाणें पुण्याहून मोटारीनें नगरावरून शिरडीस कसें जावें व काय भाडें पडतें इत्यादि माहिती त्यांनीं पुरविली.

या प्रमाणें सर्व तयारी झाल्यावर ता. २५।१।४१ शनिवारीं रात्रीं मेलनें मी बेळगांव सोडलें. आगगाडीत रेल्वे मेल सर्व्हिसच्या डब्यालगतच एका कंपार्टमेंटमध्यें चांगली जागा मिळाली. पण त्यांत एक गोम उत्पन्न झाली ती अशीः—माझे बांकावरच एक गुजराथी स्त्री येऊन बसली. रात्रीचा प्रसंग असलेमुळें मला तें बांक सोडावें लागलें आणि त्या बाकांवरील लहानशा फळीवर मी माझी पथारी हातरिली. फळी फार अरुंद होती. त्या फळीवर मध्यभागीं उभी पट्टी किंवा खाली दांडा नव्हता. तेव्हां तेथून खालीं पडण्याचा बराच संभव होता. तो माझ्या लक्ष्यांत आला. तेव्हां श्रीसाईबाबांचे स्मरण केलें. त्यांच्या द्वारकामाईतील आढ्यास चिंध्यांनीं टांगलेल्या चार हात लांब व एक वीतभर रुंद अशा फळीवर श्रीबाबा शयन करीत असत, त्याची मला आठवण झाली आणि मी त्यांची प्रार्थना केली कीं, अशा अत्यंत अरुंद फळीवर शयन करणारे आपण आतां या फळीवर माझें रक्षण करा. झोप लागेपर्यंत मी त्यांचे नांवाचा सारखा जप करीत राहिलों आणि मध्यंतरी एक दोनदां जागे झाल्यावर पुनः जप करूं लागलों. याचा परिणाम असा झाला कीं, श्रीबाबानीं त्या फळीवर माझें रक्षण केलें; मला खालीं पडूं दिलें नाहीं. याप्रमाणें रात्रींचा प्रवास सुखरूपपणें होऊन मी रविवारीं सकाळीं पुण्यास आलों.

आधीं ठरल्याप्रमाणें मी श्रीयुत आठवले यांचे घरीं गेलों. आणि आश्चर्याची गोष्ट हीं कीं, तेथें श्रीसाईबाबा माझें स्वागत करणेस तयार ! श्री. काकासाहेब दिक्षित यांना प्रथम शिरडीस जातांना नगरास श्री. काकासाहेब मिरीकर यांचे घरीं श्रीबाबांची मूर्तिमंत प्रतिमा पाहून जसा आल्हाद वाटला, तसाच आनंद मला श्री. आठवले यांचे घरीं श्रीबाबांची छबी पाहून झाली. नंतर मी तेथें स्नानसंध्या आटपून मोटारस्टँडकडे येऊन नगरच्या मोटारींत बसलों. आणि दुपारीं साडेबारा वाजतां नगरास पोंचलों. तेथें जवळच शिर्डिचा मोटारस्टँड आहे असें कोणी सांगितलें होतें पण तें खरें नव्हतें. नगरास मोटारींतून उतरतांच आमचेबरोबर प्रवास करीत असलेली एक अनोळखी सुशील बाई मला म्हणाली कीं, चला मी तुम्हांला शिरडी स्टँडकडे नेतें. त्याप्रमाणें तिनें मला तेथें नेलें. शिरडीचें तिकीट काढलें. मोटार निघण्यास अवकाश होता. तेव्हां तेथील एका खानावळींत माझें भोजन उरकून घेतलें आणि बाजारांत जाऊन श्रीबाबाकरितां कांहीं फळें घेऊन येऊन मोटारींत बसलों आणि साडेपाच किंवा सहावाजणेच्या सुमारास शिरडीस दाखल झालों.

रस्त्यावरून श्रीबाबांचें भव्य समाधिमंदिर दृष्टीस पडतें तें पाहून फार आनंद झाला. माझी राहणेची व्यवस्था समाधिमंदिरांतील बाहेरच्या खोलींत झाली. श्रीसमाधिमंदिरांत जाऊन श्रीबाबांना साष्टांग प्रणिपात करून बरोबर आणलेलीं फळें अर्पण केली. नंतर थोडी विश्रांति घेऊन ( १ ) समाधिमंदिर. ( २ ) मशीद अथवा द्वारकामाई ( ३ ) चावडी. ( ४ ) श्रीबाबांच्या गुरुंची निंब वृक्षाखालील समाधि ( ५ ) लेंडीबाग हीं पंचस्थळें नीट पाहून घेतली आणि त्यामुळें पुष्कळ दिवस वाचनांत असलेलीं हीं स्थळें प्रत्यक्ष पाहून मनाला फार समाधान झालें. रात्रौ भजन व आरति पाहिली. दुसरे दिवशीं तसेंच भजन काकड आरतीच्या प्रसंगीं हजर राहीलों. नंतर शौच मुखमार्जन करून नासिकास निघणेचा विचार करूं लागलों. कोणी सांगितलें कीं, मोटारीनें जाण्यानें फार त्रास होतो करितां ९–९॥ वाजतां मोटारीनें अगर गाडीनें कोपरगांवास ( ७।८ मैल ) जावें तेथून नदी ओलांडून कोपरगांव स्टेशनवरून मनमाडवरून नासिकास जावें म्हणजे नासिकास सायंकाळीं पोंचतां येईल. त्याप्रमाणें मी ठरविलें पण श्रीबाबांचे भक्त श्रीसगुण मेरू नाईक यांचेकडे भेटणेस आणि श्रीबाबांचे फोटो घेणेस गेलों असतां, त्यांनीं सांगितलें कीं कोपरगांवाकडून जाऊं नका, तसें गेल्यास त्रास होईल मोटारीनेंच संगमनेरवरून जा म्हणजे तुम्ही नासिकला दुपारीं ३–४ च्या सुमारास पोंचाल. त्याप्रमाणें मी बेत बदलून रस्त्यावर मोटारीची वाट पहात राहिलों. श्रीबाबांचे दोस्त भक्त श्रीमाधवराव देशपांडे यांना भेटावें अशी इच्छा होती, पण तें

१९५

इहलोक सोडून गेले आहेत असें समजलें. तसेंच तात्या पाटील कोते यांनाहि भेटावें असें वाटलें आणि चौकशी करितां कोणी एकानें सांगितलें कीं, हे पहा! तात्या पाटील कोते जवळच उभे आहेत. नंतर मी त्यांचेपाशीं गेलों आणि त्यांना नमस्कार करून त्यांचेपाशीं संभाषण केलें. कांहीं वेळ रस्त्यावर वाट पहात उभे असतां कोपरगांवची मोटार दहा वाजेपर्यंत आलीच नाहीं, पण दहाचे सुमारास संगमनेरास जाणारी मोटार आली. कोपरगांवच्या मोटारींतून जाऊन पुढें तेथून रेल्वेनें प्रवास केला असतां तर मला बराच त्रास झाला असतां व अपरात्रीं नासिकास पोंचलों असतों. संगमनेरच्या मोटारींत बसून मी निघालों, तो बाराचे सुमारास संगमनेरास पोंचलों आणि तेथून लगेच नासिकच्या मोटारींतून नासिकला दुपारी ३-३॥ वाजतां सुखरूप पोंचलों. सोमवार ते रविवार पर्यंत नासिकास राहून तेथें श्रीगजानन-महाराज गुप्ते यांचे ग्रंथ तपासण्याबाबतचें काम केलें. तेथें प्रोफेसर आठवले यांच्या श्रीरामकृष्णधामांत श्रीरामकृष्ण परमहंसलीला पाहणेस मिळाली. याप्रमाणें संतसेवा करून श्रीयुत हणमंतराव जोशी स्वामी यांचेबरोबर रविवारी रात्रीं अंटरोडला आलों आणि त्यांच्या स्वदेशी इलेक्ट्रीक घड्याळ कारखान्यांत राहिलों. मंगळवारीं दुपारी श्रीसाईलीला मासिकाचे संपादक श्री. रा. वा. चैतास यांचे बिऱ्हाडीं दादरास गेलों. ते घरीं नव्हते, तरी पण त्यांच्या घरचे मंडळींनीं माझा योग्य सत्कार करून मला श्रीसाई वाङ्मय दाखविलें. त्यापैकीं मी कांहीं खरेदीहि केलें. श्यामा अंक ( व. १७ अंक ८ ) म्हणजे श्री. माधवराव बळवंत देशपांडे यांचे चारित्र्याचा अंकहि घेतला. म्हणजे श्रीसाईबाबानें मला 'शामा'चे एकप्रकारचें अंतरंग दर्शनहि घडविलें नंतर बुधवारीं मुंबईहून निघून पुण्यास आलों. व तेथें एक दिवस राहून ता. ७।२।४१ शुक्रवारीं रात्रीं घरीं सुखरूपपणें पोंचलों. एकंदर प्रवास फार सुखकर झाला. वाटेंत कुठेंहि दगदग किंवा कसलाहि त्रास झाला नाहीं. हें सर्व श्रीसाईबाबांच्या कृपेचें फल होय याकरितां त्यांच्या आरतींत आरती म्हटल्याप्रमाणें आम्हीं प्रार्थना करितों कीं:—

श्रीसाईबाबा सौख्य दातार जीवा।<br>
चरण रजातळीं द्यावा भक्तां विसांवा।<br>
दासां विसांवा॥ आरति साईबाबा॥

ठळकवाडी, बेळगांव.<br>
१५—२—४१

नागेश वासुदेव गुणाजी

७२

# अनुभव

सन १९२७–२८ च्या पुण्यतिथिस नेहमींप्रमाणें मी आमची पत्नी आणि वडील मुलगा मनोहर यांसह शिर्डीस गेलों होतों. उत्साहानंतर पुण्यातील मुसलमान म्हातारी-बाई ' श्री बाबाजान ' यांचें दर्शन घेऊन मुंबईला जावें असे विचार शिर्डींतच असतांना आले. त्याप्रमाणें दौंडवरून पुण्यास आलों. गाडींतच माझा पुढील कार्यक्रम ठरवून स्टेशनवर उतरल्यावर फक्त दोनच रुपये सुटे होते ते बाजूला खर्चासाठीं काढून दुसऱ्या खिशांत ठेवले. पुढें व्हिक्टोरीया गाडी १॥. रुपयांत जाऊन येण्यासाठीं ठरविली. जातांना लष्कर मार्केटांतून ८ आण्यांचा फुलांचा हार घेतला. ' श्री बाबाजान ' कडे गेल्या-बरोबर त्यांनीं आमच्या छोट्या मनोहरास आमच्याकडून घेऊन 'मेरा बाबा, मेरा बाबा' म्हणून थोडावेळ आपणाकडे ठेवून घेतला. त्याठिकाणीं पुष्कळच फकीर-भिकारी त्यावेळीं असत. त्यांना चहा आणि एक एक पाव दिला त्याचा खर्च अन्दाजी २ रुपये झाला. श्री बाबा जानच्या पुढ्यांत मी कांहीं पैसे ठेवलेच. ( आतां किती ठेवले तें आठवत नाहीं ) आणि परत आलों. पुनः गाडींत बसल्यावर सहज हात खिशांत गेला तेव्हां रु. २ हातास लागले. आठवण केली पण त्याच खिशांतून पैसे खर्च केल्याची पक्की खात्री होती, शिवाय नोट वगैरे मोडली नव्हती; यावरून मला असें वाटतें कीं मी दोनच रुपयांत पुण्याचा खर्च भागविण्याचें ठरविलें तरी श्री साईबाबांनीं त्यापेक्षांहि जास्त खर्च माझ्या हातांनीं करवून पुनः मुळ भांडवल जाग्यावर ठेवलें.

सन १९३१ सालीं मला चाळीसगांवच्या कोर्टांत साक्षीसाठीं जाणें भाग पडलें. मुंबईहून आदल्या रात्रीं निघून सकाळींच चाळीसगांवाला पोंहचलों. मुंबईच्या पद्धती-प्रमाणें मला वाटलें कीं मामलेदार साहेब कोर्टामध्यें ११–११॥ वाजतां येतील पण ते फारच उशीरा आले. त्या दिवशीं माझी त्यांच्या समोर साक्ष झाली पण आरोपी ( कैदी ) नें मला त्रास देण्यासाठींच उलट तपासणी तहकूब ठेवली. अर्थांत दुसऱ्यावेळीं येणें भाग होतें. आणखी २।३ आठवड्यानीं त्याच कामा-साठीं समन्स आलें. पण ह्यावेळीं मी आधल्या रात्रीं न निघतां १ दिवस सकाळीं अगोदर निघालों; तो दुपारीं ३ वाजतां शिर्डीला पोंहचलों. त्या रात्रीं श्री बापांच्या समाधीजवळील ऑफीसच्या खोलींत निजण्याचा आग्रह तेथील मंडळीपैकीं कोणीतरी केला. मी एकटाच असल्यामुळें तेथें झोंपलों.

रात्रीं किती वाजले होते कोण जाणें पण अकस्मात जागा झालों तों श्रीबाबांच्या समाधींतून मधुर गायन ऐकूं येऊं लागलें. अतिशय मधुर गायन होतें. सुरवातीस

मी थोडा घाबरलों पण मागाहून वाटलें कीं ही बाबांची लीला आहे; असें गायन पूर्वी कोणी कोणी ऐकल्याचें सांगतात. दुसऱ्या दिवशीं सकाळींच चाळीसगांवास जाण्यास निघालों याच दिवशीं कोर्टाची तारीख होती आणि त्याच कामासाठीं मला पाठविलें होतें. माझ्या समजुतीप्रमाणें मी १०–४५ च्या सुमारास असलेली गाडी कोपरगांव स्टेशनवर पकडून मनमाडला मुंबईहून १२ ची गाडी मिळवीन, मग सहज ११॥ वाजतां कोर्टांत हजर होईन पण माझ्या श्रद्धेवर जास्त पुटें चढविण्यासाठींच कीं काय मी कोपरगांवांत गेल्यावर स्टँडवर एकही टांगा नसून सर्व स्टेशनवर गेल्याचें समजलें आणि मोटारवाले स्टेशनवर नेण्यास त्यांच्या युनीयनची परवानगी नव्हती. कोर्टांत हजर होण्याच्या सबबीवर मी एक दिवस अगोदर निघालों आणि कोर्टांत मात्र हजर होतां येत नाहीं याची काळजी लागली. शिवाय माझ्या वरीष्ठांकडून माझ्यावर ठपका येऊन डिपार्टमेन्टल शिक्षाही झाली असती. पण श्रीसमर्थांवर विश्वास ठेवल्यानें आपल्या भक्तांची काळजी त्यांना घ्यावी लागते. गाडीला फक्त १० मिनिटें राहिलीं आणि मी मनोभावें बाबांना हांक मारली, तों काय चमत्कार, मी माझ्या सरकारी पोषाकांत नसतांहि कोणीतरी मला 'फौजदार साहेब' अशी हांक मारली. कोणी हांक मारली तें ठाऊक नाहीं पण हें ऐकून अवचित एका खासगी पोषाकांत असलेल्या पोलीसानें माझ्या जवळ येऊन मला सलाम केला. आणि मला काय पाहिजे म्हणून विचारलें. तीन मैलावर असलेल्या स्टेशनवर येणारी गाडी मिळवावयाची आहे हें समजल्याबरोबर त्यांनीं तात्काळ एका मोटर-बसला माझ्या स्वाधीन केलें. मी बसलों आणि स्टेशनवर येतांच गाडी आली. अशा रितीनें मला वेळेवर कोर्टांत हजर होतां आलें. श्री बाबा अशा कितीतरी लीला आपल्या भक्तांस हरघडी दखवून त्यांना योग्य मार्गावर आणीत असतात.

हल्लीं ह्या १/२ महिन्यांत माझे मित्र रा. बाळकृष्ण सखाराम पाताडे, तुकाराम गो. पवार आणि डॉ. अनंतराव गो. दळवी बाबांच्या भजनी लागले आहेत. दोघे जरी एके ठिकाणी भेटले तरी बाबांच्याच गोष्टी बोलण्यांत येतात. त्यांच्या घरी वेळोवेळीं सुगंध, अभीर, उद अगर निरनिराळ्या फुलांचा वास येत असतो. इतकेंच नव्हे तर त्यांना दृष्टांतही फार चांगले होत असतात. कालच रा. पवार बाबांच्या दर्शनास आपल्या मंडळीसह शिर्डीस गेले आहेत.

ता. ७–३–१९४१

आपला,
नागेश आ. सावंत

९५

श्री. श्रीधर नारायण खारकर यांसीः—

डॉ. सुमंतराव रामचंद्र माने यांचा सप्रेम नमस्कार वि. वि. आपणांस कळविण्यांत येतें कीं या पत्रासोबत कै. श्री. दामोदर सावळाराम रासने यांच्या दुखवट्याच्या सभेचा रिपोर्ट पाठविला आहे. तो आपल्या साईलिला मासिकमध्यें छापून प्रसिद्ध करणेची विनंती आहे. कळावे, लोभ असावा ही विनंति.

पत्ता—मु. पुणें शिवाजी नगर
जुना तोफखाना रासने यांची चाळ,
शिवाजी नगर पुणें ५.

आपला,
S. R. Mane.

# दुखवट्याची सभा.

कै. श्रीयुत दामोदर सावळाराम रासने यांच्या निधनाबद्दल दुःख प्रदर्शित करण्याकरिता त्यांच्या श्री. साईनाथ प्रभात वाडीमध्यें ता. ९–२–१९४१ रोजीं सायंकाळीं साडेपांच वाजतां सभा भरली होती. सभेस पुरुष, स्त्रिया, मुलें व मुली मिळून सुमारे शे सव्वाशे मंडळी उपस्थित होती. जमलेल्या मंडळीमध्यें श्रीयुत डॉक्टर सुमंतराव रामचंद्र माने पेन्शनर हेही हजर होते. हे त्यांच्या विशेष परिचयाचे असलेमुळें त्यांनी अध्यक्षस्थान स्विकारावें अशी सूचना त्यांचे वडील चिरंजीव श्रीयुत दत्तात्रय दामोदर रासने यांनी केली, तिला सर्वांनीं अनुमोदन दिल्यावर श्रीयुत डॉक्टर साहेबांनी अध्यक्षस्थान स्वीकारले व ही सभा भरविण्याचा उद्देश जमलेल्या मंडळीस सांगितला. नंतर कार्यक्रम ठरल्याप्रमाणे सभेस सुरवात झाली. प्रथमारंभी त्यांच्या परिचयाचे पांच सहा इसमांनीं थोडक्यांत त्यांचे गुणानुवाद गाऊन त्यांच्या निधनाबद्दल दुःख प्रदर्शित केले. नंतर श्री. साईनाथबाबा शिर्डी संस्थानचे सभासद या नात्यानें श्रीयुत दत्तात्रय दामोदर रासने यांचे सुमारे पाऊण तास भाषण झाले. त्यांत त्यांनी आपल्या वडिलाच्या आयुष्यांतील महत्वाचीं कामें, त्यांनी केलेली जनसेवा, धार्मिक व सार्वजनीक कृत्याकडे दिलेल्या देणग्या व त्यांची लोकप्रियता, शांत प्रेमळ, परोपकारी व मनमिळाऊ स्वभाव इत्यादि सर्व गोष्टींचे समालोचन केले. त्यांचे भाषण फार हृदयस्पर्शी व परिणामकारक झाले, शेवटीं स्वतःकडे वळून आपल्या वडिलाचे निधनानें त्यांचा

(९२)

व त्यांच्या घराण्याचा आधारस्तंभ नाहींसा झाला व जो दुःखाचा डोंगर कोसळला त्याची त्यांना आठवण झाली त्यावेळीं त्यांचा कंठ भरून आला व दुःखाश्रूंनी त्यांचे डोळे भरून आले होते. शेवटीं वडिलानीं त्यांचे अंतसमयीं त्यांना उपदेश केला व आपल्या गुरूचे चरण सोडूं नको असें त्यांचेकडून अभिवचन घेतलें. नंतर शेवटपर्यंत आपल्या गुरूचें नामस्मरण करीत असतांना त्यांचे देहावसान ता. २०—३—४१ रोजीं रात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास झालें. आपले वडिलांचे शेवटच्या आज्ञेनुसार वर्तन करून आपल्या वडिलांचे पाठीमागें त्यांचें नांव राखीन असें सांगून त्यांनी आपले भाषण संपविलें. शेवटी सभेच्या समारोपाचें अध्यक्षांचें थोडक्यांत भाषण झालें. प्रपंच करून त्यांनी परमार्थ कसा साधला हे उदाहरण आपल्या समोर आहे व तें अनुकरण करण्यासारखे आहे यांत संशय नाहीं असें त्यांनी सांगितलें. मनुष्यप्राण्याचें खरे जीवन म्हणजे शेवटीं मोक्षप्राप्ती मिळण्यामध्येच आहे त्यामुळें प्रत्येक प्राणीमात्रानें आपल्या आयुष्यांत मिळालेली संधि दवडूं नये, असा कळकळीचा उपदेश केला. शेवटी आपण सर्व त्यांच्या पाठीमागें राहिलेल्या कुटुंबांतील मंडळी व आप्तेष्ट यांचेबरोबर समदुःखी आहोंत असे दर्शवून मृतात्म्यास ईश्वर चिरकाल शांति देवो व त्यांचे कुटुंबातील मंडळीचे व त्यांच्या आप्तेष्टांचे परमेश्वर समाधान करो व त्यांचें रक्षण करो अशी प्रार्थना दोन मिनिटे सर्वांनी उभे राहून मनांत केली. नंतर दुखवट्याचा ठराव सर्वांनी पास करून दुःखीत मंडळीकडे पाठविण्याचे ठरविले. नंतर सभा बरखास्त जाहली.

---

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां पुस्तकें.

—*०००*—

( १ ) सच्चरित — किं. रु. ३॥
( २ ) दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजरी
( ३ ) ,, ( अध्याय )
( ४ ) सगुणोपासना — ॥=
( ५ ) प्रधान पुस्तक ( इंग्रजी ) — १
( ६ ) शिरडी गाईड ( ,, ) — ॥=
[7] R. Vanchinathan, 30, N V. Chetty street, Triplicane, Madras [for the coloured Pictures & silver lockets]

वरील पुस्तकांकरितां व शिवाय मद्रासचे बी. व्ही. एन. स्वामीकृत इंग्रजी पुस्तक व बाबांचे विश्वसनीय फोटो वगैरे करितां खालील पत्त्यावर लिहून खुलासा घेणें:—

( १ ) कारकून, शि. संस्थान, मु. शिरडी व पो. राहते जि. अहमदनगर

( २ ) रा. रा. रामचन्द्र वासुदेव पैसास,
एडिटर, साईलीला, गोखले रोड ( नॉर्थ )
दादर, मुम्बई. १४

सौ. इंदिराबाई सुर्वेचे बाबांचे रंगित चित्र रा. रा. दा. वि. सांबारे, विलेपार्ले यांचेकडे मिळेल.

रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल, हेडमास्तर सोसाइटी हायस्कूल, उमरठे जि. सुरत यांचेकडे मिळणारी पुस्तकें:—

( गुजराथी ) मनाचे श्लोक, हरीपाठ व गुरुस्मृती.

श्री. साईनाथ भजन माला ( श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर कृत )
डॉ. व्ही. रघुनाथ L. M. & S. वांद्रा यांचेकडे मिळेल.

१९८

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to–Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 14.


छातीचे विकारावर

सांडू ब्रदर्स यांचें

हार्टिना

Regd.

(HEARTINA)

HEARTINA

excellent Heart Tonic

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखें वाटणें, छातींत घबराट होणें, फुप्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

बा. किं. रु ३ (ट. ख. नि.)

सविस्तर माहितीसाठीं लिहा

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर. लि.

आर्यौषधि कारखाना.

चेंबूर--मुंबई.


सूचनाः—कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा रामचंद्र वासुदेव चैसास लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २ गोखलेरोड नॉर्थ, दादर

Printed at Calendar Press, Dadar and Published by R. V. Chaisas-Lokmanya Tilak Jubilee Trust Bldg. No. 2 Gokhale Rd. North, Dadar, Bombay 14